बी.एम.
प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बीड | मंगळवार,दि.८ऑक्टोबर २०२४|वर्षे४रे | अंक६६वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

बीडमध्ये लोकशाही दिन

बीड: जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये लोकशाही दिनाचे ०३ अर्ज प्राप्त झाले. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात लोकशाही दिन संपन्न झाला.यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अदित्य जीवने, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (सामान्य) शैलेस सुयवंशी, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, जिल्हा पोलीस मुख्यालय, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग व पाणी पुरवठा विभाग, समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडून लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे होती, ते संबंधित अधिकारी उपस्थित होते.

भाजपचा खास 'माधव' प्लान

मनोज जरांगे पाटलांची भाजपला भिती!

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची घोषणा कोणत्याही दिवशी होऊ शकते. त्यामुळे सर्वच पक्ष कामाला लागलेत, लोकसभा निवडणुकीत भाजपला मोठा फटका बसला होता. पण विधानसभा निवडणुकीत तसे होऊ नये म्हणून भाजपने माधव प्लान आखला आहे.भाजपचा हा माधव फॉर्म्युला भाजपला विधानसभा निवडणुकीत फायदा करुन देऊ शकतो. जर हे तीन समाजाचे मतदार भाजपकडे गेले तर भाजपला मराठवाड्यात ४६ आणि पश्चिम महाराष्ट्रात ७० जागा मिळू शकतात. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपला मराठवाड्यात ३९ जागा लढवून १६ जागा जिंकल्या होत्या. तर पश्चिम महाराष्ट्रातील २६ जागांवर निवडणूक लढवून १६ जागा जिंकल्या होत्या. महायुती सरकारने अहमदनगरचे नाव बदलून अहिल्यानगर केले. अहिल्यादेवी होळकर हे धनगर समाजाचे अत्यंत आदरणीय व्यक्तिमत्व होते. आजही धनगर समाज त्यांची देवीप्रमाणे पूजा करतात. महायुती सरकारने ब्राह्मण आणि राजपूत समाजाच्या आर्थिक विकासासाठी दोन महामंडळे स्थापन करण्याची घोषणा केली.

लोकसभा निवडणुकीत भाजपला विदर्भात देखील मोठा फटका बसला. पण विदर्भ हा भाजपचा बालेकिल्ला होता. तेथेही पराभव स्वीकारावा लागला. विदर्भात विधानसभेच्या ६२ जागा आहेत. जो विदर्भ जिंकतो तो मुख्यमंत्रीपदापर्यंत जातो असं म्हटलं जातं. नागपूर हा विदर्भाचा भाग आहे, जिथून देवेंद्र फडणवीस विधानसभेची जागा लढवतात.विदर्भात दलित मतदारांची संख्या ही जास्त आहे. लोकसभा निवडणुकीत मोदी सरकार संविधान बदलणार असा प्रचार केल्याने काँग्रेसला मोठा फायदा झाला. पण आता दलित मतदारांना भाजप कसे आकर्षित करते हे देखील महत्त्वाचे ठरणार आहे. मराठा कुणबींना ओबीसी जातीचे प्रमाणपत्र देऊन खूश करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

राज्यात निवडणूक हालचालींना आला वेग

कोणत्याही क्षणी निवडणूक होणार घोषित

लोकसभा निवडणूकीत भाजपला बसला होता फटका

माधव फॉर्म्युला काय आहे!

लोकसभा निवडणुकीत महायुतीला मराठा आंदोलनामुळे मोठा फटका बसला. देशात जातीय समीकरण फार महत्त्वाचे असते. ते जर व्यवस्थित कोणत्याही पक्षाने साधले तर त्याच्यासाठी निवडणूक जिंकणे सोपे होऊन जाते. त्यामुळे भाजपने विधानसभा निवडणुकीसाठी खास माधव प्लान आखल्याचं समोर येत आहे. भाजपने ओबीसींवर लक्ष केंद्रित केलं. ज्यामध्ये माळी(मा), धनगर (ध) आणि वंजारी (व) समाजाच्या लोकांना जवळ करण्याचा भाजपचा प्लान असेल. माधव फॉर्म्युला मजबूत करण्यासाठी सरकारने कांदा निर्यात शुल्क कमी केले. पंतप्रधान मोदींनी नुकतेच बंजारा हेरिटेज म्युझियमचेही उद्घाटन केलंय. याशिवाय मराठा समाजाला आपल्याकडे कसे आकर्षित करता येईल यासाठी मराठा नेत्यांना मैदानात उतरवले जाण्याची शक्यता आहे.

मराठा आंदोलनामुळे मोठा फटका

गेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपला फक्त ९ जागा मिळाल्या होत्या. तब्बल १४ जागांचा फटका बसला होता. याची वेगवेगळी कारणे होती. अजित पवार यांच्या पक्षाशी युती करूनही भाजपला फायदा झाला नसल्याचं भाजपच्याच नेत्यांनी म्हटलं होतं. मराठा आंदोलनामुळे मनोज जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांनाच लक्ष्य केल्याने त्याचा ही फटका भाजपला बसला होता. भाजपला मराठवाड्यात एकही जागा मिळाली नाही. पश्चिम महाराष्ट्रात फक्त दोन जागा मिळाल्या. आता जर माळी, धनगर, वंजारी या पारंपारिक मतदारांनी जर भाजपला साथ दिली तर भाजपचा त्याग केला. राजकारणात 'माधव' या नावाने प्रसिद्ध असलेल्या या जातीतील शेतकरी महाराष्ट्रातील कांदा उत्पादक आहेत. कांद्याच्या भावामुळे त्यांचा मूड बदलतो. आता या जातींना खतपाणी घालण्यासाठी भाजपने नवी रणनीती आखली आहे.

राज्यात कंत्राटी नोकरभरती थांबेना

बोंबला: आता १०९ पदांचे काम कंत्राटी तत्त्वावर

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे : राज्य सरकारच्या पुरातत्त्व आणि वस्तुसंग्रहालये संचालनालयातील रिक्त असलेल्या १०९ पदांवर कंत्राटी मनुष्यबळासाठी खासगी कंपनी नियुक्त करण्यात आली आहे. त्यामुळे कंत्राटी नोकरभरती न करण्याच्या निर्णयाचे काय झाले, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. राज्यातील शासकीय सेवेतील विविध पदांची नियमित भरतीप्रक्रिया न राबवता खासगी कंपन्यांच्या माध्यमातून कंत्राटी पद्धतीने भरती प्रक्रिया राबवण्याचे धोरण निश्चित करण्यात आले होते. मात्र, त्याला राज्यभरातून विरोध करत आंदोलने करण्यात आली होती. त्यामुळे राज्यात कंत्राटी नोकरभरती रद्द करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केला होता. मात्र, त्यानंतरही पुरातत्त्व आणि वस्तुसंग्रहालये संचालनालयातील रिक्त असलेल्या १०९ पदांसाठी खासगी कंपनी नियुक्त करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. पुरातत्त्व आणि वस्तुसंग्रहालये संचालनालयातील गट क आणि ड संवर्गातील सरळसेवाच्या रिक्त असलेल्या १०९ पदांचे काम करण्यासाठी १०९ पदांच्या मर्यादेत बाह्य यंत्रणेद्वारे काम करण्यासाठी ऑगस्ट २०२३मध्ये मान्यता देण्यात आली होती. संबंधित निविदाकाराचा कार्यकाळ जुलैमध्ये संपुष्टात आला आहे. दरम्यान, संचालनालयाच्या सुधारित आकृतिबंधाला मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार संचालनालयातील १०९ रिक्त पदांची कामे बाह्ययंत्रणेद्वारे करण्यास मान्यता देण्यात आली आहे. निविदा प्रक्रियेत न्यूनतम निविदाकार ठरलेल्या विनसोल सोल्युशन्स या कंपनीच्या निविदेस मान्यता देण्यात येत असून, संबंधित

पान २ वर...

नाबार्डमध्ये नोकरी करण्याची सुवर्णसंधी

दिलासा: दहावी पास करू शकतात थेट अर्ज

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

नोकरीच्या शोधात असणाऱ्यांसाठी एक मोठी संधी आहे. विशेष म्हणजे भरती प्रक्रियेला सुरूवात झालीये. नोकरीच्या शोधात असणाऱ्यांनी अजिबात वेळ वाया न घालता भरतीसाठी अर्ज करावा. ही एकप्रकारची मेगा भरतीच आहे.

नोकरीच्या शोधात असणाऱ्यांसाठी एक अत्यंत मोठी संधी आहे. विशेष म्हणजे भरती प्रक्रियेला सुरूवात झालीये. नोकरीच्या शोधात असणाऱ्यांनी अजिबातच वेळ वाया न घालता भरती प्रक्रियेसाठी अर्ज करावीत. ही एकप्रकारची मोठी संधी आहे. विशेष म्हणजे थेट ऑनलाईन पद्धतीने या भरती प्रक्रियेसाठी अर्ज करावी लागणार आहेत. नॅशनल बँक फॉर ग्रिकल्चर अँड रुरल

पान २ वर...

महाराष्ट्रातील जनता लवकरच हिशोब मागेल!

राजकीय: प्रियांका गांधींचा महायुतीला इशारा

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

काँग्रेसच्या नेत्या प्रियांका गांधी यांनी महाराष्ट्रातील महायुतीच्या सरकारवर हल्लाबोल केला आहे. प्रियांका गांधी यांनी एक्सवर (ट्विटर) एक व्हिडीओ शेअर करत रत्नागिरीमधील रेल्वे स्थानकाचे छत उद्घाटनाआधीच कोसळल्याचा दावा केला आहे. यासंदर्भातील व्हिडीओ शेअर करत महायुतीच्या सरकारवर त्यांनी भ्रष्टाचार केल्याचा आरोप केला आहे.

तसेच राज्यातील मुंबई–नाशिक महामार्ग, सिंधुदुर्गमधील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उद्घाटनानंतर काही महिन्यांतच कोसळला, अटल

सेतूला जोडणाऱ्या रस्त्याला खड्डे पडले, अशा काही कामांचा दाखला देत प्रियांका गांधी यांनी महायुती सरकारच्या काळात झालेल्या कामांच्या दर्जाबद्दल प्रश्न उपस्थित केले आहेत. यावेळी त्यांनी महाराष्ट्रात खोके आणि धोके सरकार

पान २ वर...

छत कोसळले?

दरम्यान, प्रियांका गांधी यांनी एक्सवर (ट्विटर) एक व्हिडीओ शेअर केला आहे. यामध्ये रत्नागिरीमधील रेल्वे स्थानकाचे छत उद्घाटनाआधीच कोसळल्याचा दावा त्यांनी केला आहे. यावरूनच प्रियांका गांधी यांनी राज्यातील महायुतीच्या सरकारवर हल्लाबोल करत विकासाच्या नावाखाली जनतेची फसवणूक करून अगणित भ्रष्टाचार महायुतीच्या सरकारने केला असल्याचा आरोपही प्रियांका गांधी यांनी केला आहे.

शिवसंग्राम उपक्रमात महिलांची तोबा गर्दी!

डॉ ज्योती मेटे : बीडमध्ये होम मिनिस्टर स्पर्धा

अर्चना जगताप ठरल्या होम मिनिस्टर

या खेळात सहभागी झालेल्या महिलांनी भरपूर बक्षीस जिंकली यात प्रथम बक्षीस फ्रिज जिंकत अर्चना गणेश जगताप या होम मिनिस्टर ठरल्या तर द्वितीय बक्षीस पैठणी स्वाती रामनाथ चौबे, तृतीय पारितोषिक मिक्सर ग्राइंडर अश्विनी शरद डावकर,चतुर्थ बक्षीस कुकर पार्वती अभिषेक तिडके, पाचवे बक्षीस इस्त्री शीतल रायचंद कदम यांना मिळाली तर अनेक महिलांनी उत्तेजनार्थ पैठण या जिंकल्या.

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

नवरात्र काळात शिवसंग्रामच्या वतीनेजागर मातृ शक्तीचा हे अभियान राबवण्यात येत आहे. यानिमित्त नवरात्र काळात संबंध महाराष्ट्रत महिलांमध्ये प्रचंड लोकप्रिय असणारा होम मिनिस्टर (खेळ रंगला पैठणीचा) हा भव्य कार्यक्रम आशीर्वाद मंगल कार्यालय, बार्शी रोड, बीड येथे पार पडला यात महिलांच्या प्रचंड उपस्थितीत सिने कलाकार क्रांती नाना मळेगावकर आणि सह्याद्री मळेगावकर यांनी उपस्थित महिलांचे मन जिंकली. त्याचबरोबर मनोरंजनातून महिला सक्षमतेकडे प्रेरित करण्याचे काम या ठिकाणी डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांच्यावतीने करण्यात आले.

यावेळी महिलांसाठी अनोख्या

पान २ वर...

शिवसेना
योजना
विस्ताराची
तयारी
विजयाची
शिवसेना नेते संसदरत्न खासदार, कल्याण लोकसभा
खा.डॉ.श्रीकांतजी शिंदे साहेब
यांचा शिवसैनिकांसोबत
जनसंवाद
शिवसेना या शब्दासाठी.. अभिमानी हिंदुत्वासाठी..!
मंगळवार दि.08 ऑक्टोबर 2024 रोजी
दुपारी 12.00 वाजता
स्थळ - आशिर्वाद लॉन्स,बार्शी रोड,बीड
सचिन मुळूक
शिवसेना जिल्हाप्रमुख, बीड
अनिल जगताप
शिवसेना जिल्हाप्रमुख, बीड

स्ट्राइक रेट'चं आव्हान

तिसऱ्या आघाडीचा येणाऱ्या विधानसभा निवडणुकीवरील परिणाम यावर बरीच साधकबाधक चर्चा चालू आहे. तिसरी आघाडी प्रसवली आहे कोल्हापूरचे संभाजीराजे, शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी व प्रहारचे बच्चू कडू यांनी. यांची पार्श्वभूमी तपासली तर काय दिसून येतं? तेव्हाच्या राष्ट्रवादीतल्या साताऱ्याच्या उदयनराजेंना 'बॅलन्स' करायला फडणवीसांनी छत्रपती घराण्यातील संभाजीराजेंना भाजपतर्फे खासदारकी दिली. ती मुदत संपल्यावर त्यांना भाजपने वाऱ्यावर सोडलं. ते मग उद्धव ठाकरेंकडे खासदारकीसाठी गेले. ठाकरेंनी स्वाभाविकच संभाजीराजेंना शिवसेना प्रवेशाची अट घातली. ती संभाजीराजेंनी अव्हेरली. यावेळी त्यांना डावलून पवारांनी त्यांच्या पिताजींना, आदरणीय शाहू महाराजांना (ठाकरेंना कोल्हापूरची जागा सोडण्यासाठी राजी करून मग) काँग्रेसचं तिकीट दिलं आणि ते निवडूनही आले. उदयनराजे भाजपत आले, त्यामुळे भाजपच्या दृष्टीने संभाजीराजेंची उपयुक्तता संपली.

राजू शेट्टींना लोकसभेच्या झालेल्या निवडणुकीत हातकणंगलेतून स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे निवडणूक लढवायची होती आणि तिथे मविआतर्फे उबाठा सेनेचा दावा असल्यामुळे त्यांचा पाठिंबा हवा होता. पण शेट्टींनी मशाल चिन्हावरच निवडणूक लढवावी म्हणून उद्धव ठाकरे अडून बसले. या ठाकरेंच्या चुकीच्या निर्णयाने सीट तर शिंदेसेनेला गेलीच, पण राजू शेट्टीही विरोधात गेले.बच्चू कडू यांचा प्रकार वेगळाच आहे. शिवसेना फुटली तेव्हा बच्चू कडू शिंदे गटात सामील होताना म्हणाले, 'फडणवीसांचा फोन आला म्हणून गुवाहाटीला आलो'. त्यानंतर लोकसभेला त्यांनी अमरावती मतदारसंघात आपला उमेदवार उभा केला, भाजपच्या उमेदवारांविरुद्ध प्रचार केला. तिथे मविआचा उमेदवार निवडून आला. त्यामुळे बच्चू कडू उद्या काय करतील, हे त्यांचं त्यांनाही सांगता येत नाही.छत्रपती संभाजीराजे, राजू शेट्टी व बच्चू कडू हे असे आपापल्या राजकीय स्वार्थापोटी एकत्र आले आहेत. या तिघांचाही राग उद्धव ठाकरे व शरद पवारांवर आहे. आता असं गृहीतक मांडलं जातं की या तिघांच्या तिसऱ्या (कथित) आघाडी चा फायदा भाजपप्रणीत महायुतीला होईल, पण हेच मुळात चुकीचं वाटतं. शेट्टींनी मविआविरोधात निवडणूक लढवली, संभाजीराजेंची सहानुभूती भाजपकडे आहे, बच्चू कडू महायुतीचा भाग आहेत, त्यामुळे त्यांचे मतदार हे महायुतीबद्धल सहानुभूती असणारेच आहेत. अश्या स्थितीत त्यांचे उमेदवार महायुतीचीच मतं खातील, याचा संभव जास्त नाही का? अर्थात मुळात यांना जनाधार किती मिळेल हाच लाखमोलाचा प्रश्न आहे. कारण वंचित बहुजन आघाडी वेळोवेळी भाजप विरोधकांशी एकत्रित निवडणूक लढवायची चर्चा करते, पण शेवटी ती 'फिसकटवून' आपले स्वतंत्र उमेदवार उभे करते. यावेळी तेही तिसऱ्या आघाडीची गोष्ट करताहेत, व त्याचबरोबर आपले मतदारसंघ व उमेदवारही जाहीर करताहेत.पवारांची राजनीती सरळ आहे. आजचा दिवस आपला नाही, त्यामुळे (खरंतर नेहमीच) तत्त्व गुंडाळून जितके पसरता येतील तितकं पसरायचं. म्हणजेच योग्य वाटतील तेवढे उमेदवार उभे करून स्ट्राईक रेट वाढवून लक्षणीय आकडा गाठायचा. आताच मुख्यमंत्री पदावर चर्चा केली तर राष्ट्रवादीला अध्यक्ष जयंत पाटील यांचंच नाव घ्यावं लागेल. त्यापेक्षा थांबून विधानसभा निकालानंतर जर हुकमाचा पत्ता हातात आला तर 'पहिली महिला मुख्यमंत्री' म्हणून सुप्रियाताईंचं नाव रेटता येईल. उद्धवनी 'अदानीचे धारावीचे टेंडर म्हणा वा वर्क ऑर्डर कॅन्सल करणार' म्हणून नको तेंव्हा आपले पत्ते उघड केले. दुसरं पवारांनी 'उद्धव कार्यक्षम मुख्यमंत्री होते' अशी भलामण केली. या दोन्हीचा अर्थ उद्धव ठाकरेंची इच्छा असली तरी पवार त्यांच्या नावाला विरोध करतील, हे सूर्यप्रकाशाइतकं स्वच्छ आहे.या जर- तरच्या गोष्टी आणि रोज दिवसागणिक बदलत जाणारी परिस्थिती असल्यामुळे येत्या निवडणुकीतली उत्कंठा वाढीस लागली आहे.

..तर जगात शांतता प्रस्थापित होईल

समारंभ: केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारतीय संस्कृती जगात सर्वात जुनी असून, त्यात धर्म, जात, पंथांमध्ये कोणताही भेदभाव नाही. मात्र, बदलत्या काळाच्या ओघात आपण ती विसरल्याने, सामाजिक प्रश्न आणि देशांतर्गत संकटे निर्माण झाले आहेत. भारतीय संस्कृतीमधील तत्त्वे आणि मूल्ये प्रत्येकाने आचरणात आणल्यास, जगात खऱ्या अर्थाने शांतता प्रस्थापित होण्यासाठी मदत होणार आहे, अशी भूमिका केरळचे राज्यपाल आरिफ महंमद खान यांनी जागतिक संसदेच्या समारोपात शनिवारी मांडली.एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या वतीने विज्ञान, धर्म/ अध्यात्म आणि तत्त्वज्ञानावर आधारित १० व्या जागतिक संसदेच्या समारोप समारंभात खान यांनी आपले विचार मांडले.

या वेळी झोराष्ट्रीयन कॉलेजच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. मेहर मास्टर मूस, पद्मश्री डॉ.चंद्रकांत पांडे पाहुणे म्हणून उपस्थित होते. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, कार्यकारी अध्यक्ष राहुल कराड, डब्ल्यू पी यु चे कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस संसदेचे मुख्य समन्वयक व, प्र. कुलगुरु प्रा. डॉ. मिलिंद पांडे, उपस्थित होते.डॉ आरिफ महंमद खान म्हणाले की, भारतीय संस्कृतीत भेदभाव करण्याबाबत सांगितलेले नाही. येथील नागरिकांचे धर्म, संस्कृती, रूढी परंपरा, खानपान पद्धती या वेगळ्या असल्या, तरी त्यांचे मूळ हे एकच आहे. त्यामुळे आपण भारतीय नागरिक एकच असून, ती संस्कृती पुढे नेण्यासाठी प्रयत्न करायचे आहे. अध्यात्म म्हणजे समोरच्या व्यक्तिबाबत प्रेम आणि आत्मितेयची भावना असणे. ही भावना तुम्ही समोरच्या व्यक्तीसाठी व्यक्त केली, तर तुमच्यासाठीही अशाच भावना समोरून व्यक्त होतील.सध्याची परिस्थिती लक्षात घेता, आपल्याला स्वामी विवेकानंदांनी सांगितलेला संदेश लक्षात घेतला पाहिजे. त्यांच्यासाठी सर्व धर्म आणि नागरिक एकसारखे होते. हीच भावना आपल्याला निर्माण करायची आहे. त्याद्वारे आपण देशात आणि जगात खऱ्या अर्थाने शांतता निर्माण करू शकू,

WORLD PEACE DOME
WORLD PEACE DOME

गौतम बुद्ध आणि महात्मा गांधी यांच्यासारख्या शांतीदूतांनी दाखविलेल्या मार्गावर चालण्याची गरज विश्वनाथ दा. कराड यांनी ओळखली. मानवजातीच्या कल्याणासाठी विज्ञान आणि धर्म किंवा अध्यात्म यांचा मेळ घालण्याच्या स्वामी विवेकानंदांच्या भविष्यसूचक शब्दांवरील त्यांच्या विश्वासामुळे त्यांना विज्ञान, धर्म, अध्यात्म आणि तत्त्वज्ञानाची पहिली जागतिक संसद आयोजित करण्यास प्रवृत्त केले, असे गौरवोद्गार अरिफ महमंद खान यांनी काढले.

यावेळी खान यांनी डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या पुतळ्याचे कौतुक करीत, डॉ. कराड यांनी हातात भगवत गीता ठेवत जगाला शांततेचा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे, असे स्पष्ट केले.डॉ. विश्वनाथ कराड यांनी जागतिक संसदेची भूमिका विशद करीत, थोर पुरुष आणि विचारवंतानी सांगितलेल्या मार्गावर आपल्याला चालायचे आहे, असे स्पष्ट केले.सूत्रसंचालन डॉ. गौतम बापट यांनी केले. कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस यांनी आभार मानले.

राहुल कराड म्हणाले, आपल्या आजुबाजुला घडणाऱ्या गोष्टींचा विचार करता आपल्याला अध्यात्म आणि शांततेची आवश्यकता आहे. त्यासाठी जगातील सर्व विद्यापीठांसाठी वर्ल्ड पीस सिलॅबस तयार करता येईल का, याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. याचा फायदा आपल्याला काही वर्षांनी होईल. विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर चालण्याची आवश्यकता आहे. आपण भारताला जगाचे विश्वशांतीची राजधानी बनविण्यासाठी प्रयत्न केले पाहीजे. विद्यार्थ्यांनी विश्वशांतीचा संदेश जगात चित्रांच्या माध्यमातून पोहोचविण्यासाठी चित्रांच्या स्पर्धा घेण्यात येईल.

छपरी रोमीओंचा उतरविला माज!

बडगा: पोलीस अधीक्षक यांची धडाकेबाज कारवाई

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

पोलिसांना माहिती मिळाली होती की काही टवाळखोर हे कॉफी शॉप, शाळा, कॉलेज समोर, ट्युशनला जाण्याच्या रस्त्यावर उगाचच टवाळक्या करत उभे राहतात आणि त्यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या महिला मुले मुली तसेच शाळा कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुलींना विद्यार्थिनींना याचा त्रास होत असतो. अशा टवाळखोरांवर कारवाई करण्याच्या सूचना वरिष्ठांकडून प्राप्त झाल्या होत्या. त्यावरून बीड जिल्ह्य़ातील सर्व पोलीस स्टेशनला पथके स्थापन करून सदर पथकांच्या मदतीने बीड शहर व जिल्ह्य़ात आज एकुण ६७ टवाळखोरांना बीड पोलिसांनी ताब्यात घेतले आणि त्यांच्यावर मुंबई पोलीस कायद्याप्रमाणे कारवाई केली आहे.

सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री अविनाश बारगळ, अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.शितलकुमार बल्लाळ, मारुती खेडकर, अशोक मुदीराज, विनोद घोळवे, सपोनि मधुसुदन घुगे, राजकुमार ससाने, सोमनाथ नरके व पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

पान एक वरून

राज्यात कंत्राटी नोकरभरती

निविदाप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत रोजंदारी तत्त्वावर सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या दरानुसार उपलब्ध मनुष्यबळातून करण्यात येत असलेल्या सेवांना मुदतवाढ आली आहे. तसेच या कंत्राटाचा कालावधी एक वर्ष किंवा नियमित पदे भरण्यात येईपर्यंत जे कमी असेल त्या कालावधीपर्यंत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.कंत्राटी तत्त्वावरील १०९ पदांमध्ये मुंबईतील मुख्यालय, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, रत्नागिरी, नांदेड येथील कार्यालये, तसेच वस्तुसंग्रहालयांतील बहुद्देशीय कर्मचारी, डेटा एण्ट्री ऑपरेटर, समन्वयक, वाहनचालक अशा पदांचा समावेश असल्याचे दिसून येत आहे.

नाबार्डमध्ये नोकरी करण्याची

डेव्हलपमेंट (नाबार्ड) मध्ये नोकरी करण्याची संधी तुमच्याकडे आहे. चला तर मग जाणून घ्या या भरती प्रक्रियेबद्दल अधिक आणि अर्ज करण्याची सोपी प्रक्रिया. नॅशनल बँक फॉर ग्रिकल्चर अँड रुरल डेव्हलपमेंट (नाबार्ड) कडून ही भरती प्रक्रिया राबवली जातंय. या भरती प्रक्रियेची अधिसूचना देखील प्रसिद्ध करण्यात आलीये. या भरती प्रक्रियेची सर्वात खास बाब म्हणजे दहावी पास उमेदवार हे या भरती प्रक्रियेसाठी आरामात अर्ज करू शकतात. ही एक खरोखरच मोठी संधी संधी आहे. नाबार्डकडून ही भरती प्रक्रिया १०८ पदांसाठी राबवली जातंय. परलरीव.ीस या साईटवर जाऊन उमेदवारांना भरती प्रक्रियेसाठी अर्ज ही करावी लागणार आहेत. तिथेच आपल्याला भरती प्रक्रियेची सविस्तर माहिती मिळेल. या भरती प्रक्रियेसाठी वयाची अट ही लागू करण्यात आलीये. यासोबत वयाची अटही लागू करण्यात आलीये. या भरती प्रक्रियेसाठी १८ ते ३० वयोगटापर्यंतचे उमेदवाद हे आरामात अर्ज करू शकतात. नियमानुसार वयाच्या अटीमध्ये थोडी सूट प्रवर्गातील उमेदवारांना देण्यात आलीये. या भरती प्रक्रियेसाठी उमेदवारांना ५०० रूपये फीस ही द्यावी लागेल. उमेदवाराची निवड ही उमेदवारांची निवड ऑनलाइन परीक्षेच्या आधारे केली जाईल. नोकरीच्या शोधात असणाऱ्यांनी अर्ज करावीत.

महाराष्ट्रातील जनता लवकरच

असून येथील जनता लवकरच हिशेब करेन, असा हल्लाबोल प्रियांका गांधी यांनी केला आहे.महाराष्ट्रातील रत्नागिरीमधील रेल्वे स्थानकाचे छत उद्घाटनापूर्वीच कोसळले आहे. दुसरीकडे मुंबई–नाशिक महामार्ग जो अद्याप पूर्णत: तयारही झाला नव्हता. त्यात ५०० हून अधिक खड्डे पडले आहेत. यापूर्वी सिंधुदुर्गमधील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उद्घाटनानंतर काही महिन्यांतच कोसळला. मुंबईत १८ हजार कोटी रुपये खर्चून बांधलेल्या अटल सेतूला जोडणाऱ्या रस्त्याला खड्डे पडले आहेत. महाराष्ट्रातील खोके आणि धोके सरकारने विकासाच्या नावाखाली जनतेची फसवणूक करून अगणित भ्रष्टाचार केला आहे. मात्र, महाराष्ट्रातील जनता याचा लवकरच हिशेब करणार आहे, असा इशारा प्रियांका गांधी यांनी महायुतीला दिला आहे.

शिवसंग्राम उपक्रमात महिलांची

उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल उपस्थित महिलांनी स्वयंस्फूर्त डॉ. ज्योती मेटे यांचा सत्कार केला. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.कुटुंबाचा कणा असलेल्या महिलांची दैनंदिन जबाबदाऱ्या पार पाडत असताना होणारी दमछाक विचारात घेऊन त्यांच्यातील ताणतणावांचा निचरा होणे व अष्टभुजाचे मानसिक बळ त्यांच्यामध्ये निर्माण व्हावे याकरिता मनोरंजनातून सक्षमतेकडे या विचारातून आज न्यू होम मिनिस्टर खेळ रंगला पैठणीचा हा कार्यक्रम येथे आयोजित करण्यात आला आहे असे मत याप्रसंगी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमास महिलांनी भरभरून प्रतिसाद दिला कार्यक्रमांमध्ये मनोरंजना सोबतच महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी उद्योजकतिकडे वळविण्यासाठी नवनवीन उद्योगांची माहिती देण्यात आली. तसेच या महिलांना लघु उद्योगांमध्ये मोलाचे सहाय्य करणाऱ्या उमेदच्या प्रेरकाना व्यासपीठावर बोलावून डॉ. ज्योती मेटे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

पान सहा वरून

निवडणूक तोंडावर उदघटनांचा

कामे केली. असा सरळ सरळ प्रश्न जनतेमधून विचारला जाऊ लागला आहे. आता निवडणूक तोंडावर आली असल्याने, फुकटचे श्रेय घेणारे आमदार नमीता ताई यांना आपण आमदार असल्याची जबाबदारी लक्षात आली असून, विकास कामे केले पाहिजे असे त्यांना आता वाटू लागले आहे. यामुळेच भानावर आलेल्या आमदार नमीता ताई यांनी आता अगदी शेवटच्या टप्प्यात विकास कामांच्या उद्घाटनाचा सपाटा चालु केला आहे.

जनतेला वेड्यात काढू नका : आमदार नमीताताई यांनी मतदार संघातील जनतेच्या भावना लक्षात घेण्याची गरज होती. आता निवडणुकीच्या तोंडावर ते जनतेचे आणि त्या परिसरातील कार्यकर्त्यांची तोंड धरू लागले आहेत. यावेळीही आपल्यालाच जनतेने निवडून द्यावे असे त्यांना वाटते मात्र गेल्या पाच वर्षात आमदारांनी आपल्याला वेड्यात काढले त्याची जाणीव मतदार संघातील प्रत्येक माणसाला आहे. त्यामुळे आमदार नमीता ताई जनतेला वेड्यात काढू नये, अशा भावना जनसामान्यातून उमटत आहेत.

शिक्षकाने पेशाला काळिमा

अंबादास वायखिंडे यास शनिवारी रात्री पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यानंतर न्यायालयाने आरोपीस चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या प्रकरणानेमुळे माजलगावकरांमध्ये मोठ्या प्रमाणावर संताप आहे. यामुळे हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपीस फाशी देण्यात यावी या मागणीसाठी आज माजलगाव बंदची हाक देण्यात आली होती. आज सकाळीपासूनच शहरातील व्यापाऱ्यांनी सर्व व्यवहार बंद ठेवून या बंदमध्ये सहभाग नोंदवला. दरम्यान, जुन्या शहरातील हनुमान चौकातून तहसील कार्यालयावर नागरिकांनी भव्य मोर्चा काढला. येथील उपविभागीय अधिकारी यांना विविध मागण्याचे निवेदन यावेळी विद्यार्थ्यांच्या हाताने देण्यात आले. मोर्चात शहरातील अनेक शाळेमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. त्याचबरोबर विविध सामाजिक संघटना, व्यापारी, सर्वपक्षीय पदाधिकारी यांनी सहभाग नोंदवला. मोर्चात महिलांचा सहभाग लक्षणीय होता.

केज हद्दीत एलसीबीचे

सय्यद गज्जु उस्मान दोघे रा. इस्लामपुरा यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून नगदी रक्कम व जुगाराचे साहित्य मिळून ७२ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. दुसरी कारवाई संतोष लॉजच्या बाजूला तिर्रट जुगार खेळणारे आरोपी ज्ञानेश्वर उध्दव हरिदास रा. केज, विशाल युवराज कसबे रा. चिंचोली माळी, शहादेव महादेव शिंदे रा. केज, शंकर भिमराव गायकवाड रा. चिंचोली माळी, रवि काशिनाथ काळे रा. केज, आकाश राजाभाऊ रा. कानडी, सतिष वसंत काळे रा. केज, विलास काशिनाथ जाधव रा. केज यांना ताब्यात घेऊन जुगाराचे साहित्य व नगदी ४ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तिसरी कारवाई केज शहरातील मटका अड्ड्यावर करण्यात आली. येथे छापा मारुन आरोपी इस्माईल मसीयोद्दीन इनामदार रा. केज, संकेत भारत जाधव रा. अंबाजोगाई, प्रमोद प्रदिप सत्वधर रा. केज, गणेश सुधीर खराडे रा. केज यांना ताब्यात घेऊन मटका जुगाराचे साहित्य व नगदी रक्कम असे ३७ हजार ८१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. चौथी कारवाई बसस्थानक जवळ असलेल्या ऑनलाइन अवैध जुगार अड्ड्यावर छापा मारला असता येथे एलइडी स्क्रीनवर ऑनलाईन फन गेम नावाचा जुगार पैसे घेवून खेळत व खेळवीत असताना आरोपी सुभाष उत्तरेश्वर जाधव रा. मर्कज मस्जीद जवळ केज यास ताब्यात घेवून जुगाराचे साहित्य व नगदी असा ४० हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

बीड शहराचे सांस्कृतिक

नाळ कधी तुटू दिली नाही कुठलाही जातीभेद न करता अल्पसंख्यांक असतानाही बीड शहराच्या मतदार संघाच्या आणि जिल्ह्याच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिलो आहोत, बदलत्या राजकारणामुळे प्रचंड अफवांचे पेव फुटले आहे पण अशाही परिस्थितीत आम्ही समाजाचे काहीतरी देणे लागतो या उदात्त भावनेतून लोकांच्या हिताचे जे असेल ते करण्याचा प्रयत्न करत असतो बीड शहरात सांस्कृतिक वैभव टिकावे यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न आम्ही केलेले आहेत असे ते म्हणाले भाषणानंतर खेळ पैठणीचा सुरू करण्यात आला यावेळी मेडिकल कॉलेजचे मैदान महिलांनी पूर्ण भरले होते,अंतिम फेरीत ज्या महिला विजेत्या होतील त्यांना शुभेच्छा दिल्या

डॉ.योगेश क्षीरसागरांच्या नेतृत्वावर

बहिरवाळ, भारत डोंगर, संतोष मुळे, भाऊ मस्के, जयराम मस्के, अशोक बहिरवाळ, महेश चव्हाण, बिभीषण दहे, बाळू दहे, गणेश बहिरवाळ, शाम बहिरवाळ, अशोक दहे, किरण चव्हाण, वाघमारे, विलास बहिरवाळ, महादेव मुळे, संदीप मुळे, ऋषिकेश बहिरवाळ, रोहित बहिरवाळ, शुभम बहिरवाळ, सूरज चव्हाण, ओंकार बहिरवाळ, प्रमोद बहिरवाळ, सोमीनाथ दहे, बिभीषण दहे यांच्यासह अनेक तरुणांनी प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, अमर विद्यागर आदी उपस्थित होते. शहरातील कागदी वेस, अजिजपुरा भागातील रवी वडमारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रवेश केला. याप्रसंगी नगरसेवक मुन्ना इनामदार, शुभम धूत, बिलाल शेख, गजानन जवकर, शैलेश गिरी, ज्ञानेश्वर राऊत, किरण बेद्रे, डॉ.शेख शकील, शुभम वीर आदींची उपस्थिती होती. आहेर वडगाव येथील शिवाजी रोहिटे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसमवेत पक्षात प्रवेश केला. याप्रसंगी बालासाहेब काटे, गोरख रोहिटे, बाळू रोहिटे, पिंटू सपकाळ, नवनाथ रोहिटे, कृष्णा सोळूंके, सचिन सोळूंके, जावेद शेख, अजित डोंगरे, धनंजय राऊत, मुकिंद रोहिटे, राजाभाऊ रांजवन, शहाजी कदम, लखन रोहिटे, सुदाम रोहिटे, निवेदक बाबासाहेब रांजवन यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ.क्षीरसागरांचा संघटन मजबूत करण्यावर भर : ना.अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी एक वर्षापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. तेव्हापासून पक्षाची सदस्य नोंदणी, विविध पद नियुक्त्या, पक्षाचे प्रचार व प्रसाराचे कार्यक्रम राबविणे अशा माध्यमातून निष्ठेने काम करत संघटन मजबूत करण्यावर भर दिला आहे. विकासाचे व्हिजन, थेट जनसंपर्क, तत्पर यंत्रणेमुळे बीड विधानसभा मतदारसंघात डॉ.योगेश यांच्या नेतृत्वावर जनतेचा अधिक विश्वास असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यांचा संघटन मजबूत करण्यावर कायम भर राहिला आहे.

सेवानिवृत्त झाल्याबद्दल

ड्युटी प्रामाणिकपणे केली असे शिस्तप्रिय तसेच वेळप्रसंगी कठोर भूमिका घेऊन सर्वसामान्यावर जर अन्याय झाला तर त्याला न्याय मिळवून देण्यासाठी कठोर भूमिका बजावणारे मोरे मामा यांचा सर्व नवीन होमगार्डने आदर्श घेऊन समाजाच्या संरक्षणासाठी आपल्या ड्युटीचा उपयोग करावा असे गौरव उदगार होमगार्ड तालुका समादेशक सतिश दाभाडे यांनी मोरे यांच्या सेवानिवृत्त कार्यक्रमा दरम्यान बोलत असताना केले. या सत्कार समारंभामध्ये चोरगे साहेब, ज्ञानेश्वर सपकाळ, पाचंगे साहेब, वारे साहेब, आतकरे साहेब, हातागळे साहेब, केंद्रे साहेब, सूर्यवंशी साहेब, हुलगे, सुतार, ढोबळे, सावंत ताई, घुंगासे ताई, तसेच रमेश हातमोडे यांच्यासह मित्रपरिवार व शुभचिंतकांनी उपस्थित राहून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कृषी सेवारत्न पुरस्काराने

योजनांच्या मार्गदर्शक सूचना प्रथमत: तयार केल्या. याच कालावधीत त्यांनी तयार केलेल्या विविध फुलपिकांची पुस्तके, घडीपत्रिका, फिल्म इत्यादी शेतकऱ्यांसाठी त्या कृषी विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आल्या. त्यांनी १९९९ मध्ये इटली, नेदरलँड आणि फ्रान्स या देशांमध्ये जाऊन हरितगृहातील फुलशेतीचे प्रशिक्षण घेतले. तसेच २०१४ मध्ये इस्त्राईल येथे जाऊन भाजीपाला रोपवाटिका व्यवस्थापन या विषयावरील पंधरा दिवसीय प्रशिक्षण घेतले. राजगुरुनगर येथे आदर्श पुष्प उत्पादन केंद्र विकसित करून पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना हरितगृहातील फुलशेतीचे प्रशिक्षण यांचेमार्फत देण्यात आले. कृषी आयुक्तालयामध्ये तेलबिया विकास विभाग, नियोजन विभाग, आयुक्त कृषी कक्ष अशा विविध ठिकाणी त्यांनी भरीव कामगिरी केली आहे. कृषी आयुक्तालयामध्ये येणाऱ्या टपाल व्यवस्थापनासाठी त्यांनी ईएलएफएमएस अशी संगणकीकृत प्रणाली विकसित केली. कृषी आयुक्तालयातील त्यांचे कामकाज पाहून तत्कालीन कृषी आयुक्त डॉ. सुधीर कुमार गोयल, डॉ. उमाकांत दांगट, डॉ. कृष्णा लव्हेकर , सचिन्द्र प्रताप सिंग आणि डॉ. सुहास दिवसे यांनी वेळोवेळी त्यांना प्रशंसा पत्र देऊन त्यांच्या कामाची दखल घेऊन कौतुक केले . याशिवाय त्यांनी स्वतःच्या शेतात देखील आंबा, लिंबू, बांबू आणि जांभूळ यासारख्या फळझाडांची लागवड करून एक आदर्श निर्माण केला आहे. विनायक देशमुख यांच्या ३३ वर्षाच्या प्रामाणिक आणि आदर्श सेवेची दखल घेऊनच शासनाने डॉ विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार प्रदान करुन सन्मानित केले. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

मी माझी उमेदवारी भाजपा

बाबरी मुंडे संपर्क कार्यालयाचे उद्घाटनाला भाजपाचे ज्येष्ठ नेते डॉ. प्रकाश आनंदगावकर, नपचे माजी नगराध्यक्ष अशोक तिडके, महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष संजीवनी राऊत, यांच्यासह अनेक भाजप पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. माजलगावची जागा राष्ट्रवादीला जाण्याची शक्यता आहे. यामुळे येतील भाजपाचा पदाधिकारी कार्यकर्ता मतदार हवालदिल झाला आहे. यातच राष्ट्रवादीचेच काही बंडखोर ना.धनंजय मुंडे व आ. पंकजा मुंडे यांचे फोटो लावून मतदार संघात फिरत आहेत. अशा स्थितीत बाबरी मुंडे यांची माजलगाव मतदार संघात भाजपाकडे तिकिटाची मागणी ही योग्यच असल्याने भाजपातील बरेच नेते कार्यकर्ते म्हणत आहेत तर दुसरी कडे आपण पक्ष प्रमुखकाडे वेळ दिला आहे तिकेट मिळेल ही अपेक्षा आहे नाही तर मी माझ्या अठरा पगड जातीधर्माच्या असंख्य कार्यकर्ते च्या जीवावर अपक्ष लढण्याची घोषणा करत केलेली आहेच

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

वंचितचे कार्यकर्ते दिपक केदारच्या पँथरमध्ये!

पक्षांतर परळी मतदार संघात प्रवेश सोहळा

परळी पुण्यभूमी/ प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते गौतम आदमाने यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी ऑल इंडिया पँथर सेनेत संस्थापक अध्यक्ष दीपक भाई केदार यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर पक्ष प्रवेश केला. यावेळी बोलताना दीपकभाई केदार यांनी राज्याचे कृषिमंत्री व पालकमंत्री नामदार धनंजय मुंडे यांच्या कार्यावर सडकून टीका केली.

५ आक्टोबर २०२४ रोजी मौजे नाथ्रा येथे ऑल इंडिया पँथर सेना भव्य प्रवेश सोहळा कार्यक्रम आयोजित केला होता. परळी विधानसभा मतदारसंघातील आंबेडकरी चळवळीतील खंबीर नेतृत्व पॅंथर गौतम भाई आदमाने , विकास वाव्हळे, अमित सावंत, यांच्या सह शेकडो कार्यकर्त्यानी ऑल इंडिया पँथर सेनेत प्रवेश केला. यावेळी गौतम केदार यांनी परळी तालुकाध्यक्ष पदी गौतम आदमाने यांची निवड केली.राष्ट्रीय अध्यक्ष दिपक भाई केदार यांचे नेतृत्व स्विकारूण आंबेडकरी चळवळीला गतीमान करूण दलित मुस्लिम आदिवासी यांच्या संरक्षणाची जबाबदारी इथला तरुणवर्ग पँथरच्या माध्यमातून आपल्या खांद्यावर घेत आहे. मेळाव्याला संबोधित करताना दिपक भाई केदार यांनी पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या कारभारावर सडकून टीका केली. नाथ्रा ग्रामपंचायत कार्यालयचा कारभार ग्रामसेवक अविनाश तोटे हे अंबाजोगाई मधये बसून हाकत आसल्यामुळे नाथ्रा ग्रामपंचायत कार्यालय आस्तित्वात नाही, धनंजय मुंडे हे सामाजिक न्याय मंत्री आसताना दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजना गावात राबवली असती तर एकही दलित आज भुमिहिन राहिला नसता, २ वर्षा पासून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा समाज मंदीरा मध्ये झाकून ठेवला आहे स्मारक बांधकामासाठी ग्रामपंचायत कडे निधी नाही, गावात येताना लाईट नसल्यामुळे गाव दिसेना , महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात लाईट नसल्यामुळे पुतळा अंधारात असतो समाज मंदीराची अत्यंत वाईट परस्थिती आहे धनंजय मुंडे सामाजिक न्याय मंत्री असताना महाराष्ट्रा मधे बौद्ध विहाराला निधी दिला परंतु स्वतःच्या गावा मधे विहार निर्माण केले नाही, बर्दापूरच्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा विटंबना प्रकरणात आंबेडकरी समाजाला शांत करण्यासाठी ६ महिन्यात स्मारक निर्माण करू असे आश्वासन दिले परंतु ६ वर्षे झाली तरी तेथे काम पूर्ण नाही १४ आक्टोबर पर्यन्त महामानवाचे स्मारकाचे काम पुर्ण नाही केले तर पालकमंत्री धनंजय मुंडे यांना बीड जिल्हात विधानसभा निवडणुकीत फिरू दिले जाणार नाही असा इशारा राष्ट्रीय अध्यक्ष दिपक भाई केदार यांनी मेळाव्याला संबोधीत करताना दिला. मेळाव्याला प्रदेश सरचिटणीस जीवन गायकवाड, मराठवाडा युवक अध्यक्ष अक्षय भैय्या भुंबे, बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, गौतम आदमाने यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

प्रदेशाध्यक्ष विनोद भोळे, प्रदेश कार्याध्यक्ष अशोक पाटील , महिला जिल्हाध्यक्षा मिनाताई लोंढे, युवक जिल्हाध्यक्ष ग्रा. नितीन गोदाम, युवक जिल्हाध्यक्ष श. अमर वाघमारे , परभणी युवक जिल्हाध्यक्ष निवृती वाघमारे महाराज , जिल्हा महासचिव अनिल उजगरे , जिल्हा सचिव परमेश्वर काटे , जिल्हा सरचिटणिस विजयबाबा कांबळे , जिल्हा संघटक सुशिल गायकवाड ,जिल्हा सचिव वसीम भाई शेख , आयटी प्रमुख प्रतिक वाघमारे ,अंबाजोगाई तालुकाध्यक्ष बादल तरकसे, केज तालुकाध्यक्ष समाधान बचुटे, अंबाजोगाई ता. महीला अध्यक्ष रेखाताई मस्के, बीड ता. महिला अध्यक्ष कावेरीताई जाधव , अंबाजोगाई युवक ता.अध्यक्ष शैलेंद्र बनसोडे , परळी युवक ता. अध्यक्ष धम्मपाल भुतके, केज युवक ता. अध्यक्ष राज कुमार धिवार यांच्या सह शेकडो पँथर उपस्थित होते .

डोंगर तुकाई देवीचे घेतले दर्शन

धनंजय मुंडे: नाथ प्रतिष्ठानच्या प्रसाद वाटपात सहभाग

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आज नवरात्रनिमित परळी वैद्यनाथ शहरातील डोंगर तुकाई देवीचे दर्शन घेतले. राज्यातील शेतकरी, कष्टकरी, सर्व सामान्य नागरिकांच्या आयुष्यात उत्तम आरोग्य व संपन्नता नांदू दे, अशी प्रार्थना यावेळी मुडेंनी देवीच्या चरणी केली. धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने संपूर्ण नवरात्रात डोंगर तुकाई परिसरात भाविकांसाठी खिचडी प्रसादाचे वाटप अविरतपणे सुरू आहे. या उपक्रमात आज धनंजय मुंडे यांनी देखील सहभाग घेतला.

धनंजय मुंडे यांनी स्वतः खिचडी बनवण्यात प्रत्यक्ष सहभाग घेतला. त्याचबरोबर त्यांनी भाविकांना खिचडी वाटपही केले. यावेळी नाथ प्रतिष्ठानचे सचिव नितीन मामा कुलकर्णी, अनंत इंगळे, जितेंद्र नव्हाडे, रमेश बुद्रे, महावीर महालिंगे, ओम वाघमारे, पप्पूशेटे, रंगनाथ सावजी, अक्षय गायकवाड, पंकज कोथळकर, भूषण आंबेकर, नितीन देशपांडे, वैजनाथ सोनटक्के, शिवा सोरडगे, दत्ता घुले, हनुमान गित्ते, प्रशांत पोहनेरकर, राज लटपटे, शिरीष राजूरकर, यांसह पदाधिकारी आदी उपस्थित होते. धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून व ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली मागील पंधरा वर्षांपासून अविरतपणे हा उपक्रम सुरू आहे. पहाटे साडेपाच वाजल्यापासून दुपारी साडेतीन वाजेपर्यंत प्रसाद वाटप सुरु असते. द्वितीया ते सप्तमी पर्यंत तांदूळ खिचडी केली जाते, यासाठी २५ ते ३० क्विंटल तांदूळ लागतो. तर अष्टमी ला सुमारे ७ क्विंटल साबुदाणा खिचडी करण्याचे नियोजन आहे. अखेरच्या दिवशी ५०० किलो मोतीचूर लाडू प्रसाद म्हणून वाटले जाणार असल्याची माहिती नाथ प्रतिष्ठानचे सचिव नितीन मामा कुलकर्णी यांनी दिली आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून बाळकृष्ण हानपुडे

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

आष्टीचे तत्कालिन उपविभागीय पोलीस अधिकारी अभिजीत धाराशिवकर यांची पालघर येथे प्रशासकीय बदली झाल्यामुळे त्यांच्या रिक्त जागेवर आता नांदेड येथून आलेले बाळकृष्ण हानपुडे यांनी नव्याने आष्टीचा पदभार स्वीकारला आहे.

आष्टी येथील तत्कालिन उपविभागीय पोलीस अधिकारी अभिजीत धाराशिवकर यांचा तीन वर्षाची पोलिस दलातील कार्यकाळ हा यशस्वी ठरली होती. त्यामुळे अभिजीत धाराशिवकर यांची पालघर येथे प्रशासकीय बदली झाली होती. अखेर आष्टीच्या या रिक्त जागेवर अडीच महिन्यानंतर नांदेड येथून आलेले बाळकृष्ण हानपुडे यांनी नव्याने आष्टीचा उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून सोमवार दि. ७ रोजी या पदाचा पदभार स्वीकारला आहे.

धावण्याच्या स्पर्धेत मारली बाजी

क्रीडा: ईश्वरी बिभीषण देशमुख द्वितीय

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

विद्यावर्धिनी विद्यालयाची विद्यार्थिनी कु. ईश्वरी बिभीषण देशमुख इयत्ता ७ वी मध्ये शिकणारी हिने आज दि ६ ऑक्टोबर २०२४ रविवार बीड जिल्हा पातळीवर येथे धावण्याच्या स्पर्धेत (मैदानी)६००मिटर द्वितीय क्रमांक व ४००मिटर मध्ये प्रथम क्रमांक मिळवून विभागीय स्तरावर निवड झाल्याबद्दल या तिच्या यशाबद्दल समर्थ शिक्षण प्रसारक मंडळा चे अध्यक्ष कोळगे साहेब, उपाध्यक्ष भिंगोरे साहेब, सचिव इटके साहेब सन्माननीय संचालक पैंजणे साहेब, एम. टी. मुंडे साहेब, चेवले साहेब, मातेकर सर, संजय कराड सर तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांनी तिचे कौतुक केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्याविद्यावर्धिनी विद्यालयाची विद्यार्थिनी कु. ईश्वरी बिभीषण देशमुख इयत्ता ७ वी मध्ये शिकणारी हिने आज दिनांक ६ ऑक्टोबर २०२४ रविवार बीड जिल्हा पातळीवर येथे धावण्याच्या स्पर्धेत (मैदानी)६००मिटर द्वितीय क्रमांक व ४००मिटर मध्ये प्रथम क्रमांक मिळवून विभागीय स्तरावर निवड झाल्याबद्दल या तिच्या यशाबद्दल समर्थ शिक्षण प्रसारक मंडळा चे अध्यक्ष कोळगे साहेब, उपाध्यक्ष भिंगोरे साहेब, सचिव इटके साहेब सन्माननीय संचालक पैंजणे साहेब, एम. टी. मुंडे साहेब, चेवले साहेब, मातेकर सर, संजय कराड सर तसेच शाळेतील. माध्य.मु. अ. नीला सर सर्व शिक्षक वृंद यांनी तिचे कौतुक केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

केजमध्ये तुतारीकडून आपण सज्ज

डॉ अंजलीताई घाडगे :मतदार संघात गावागावात भेटी

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज मतदारसंघामधे आपण विधानसभा निवडणूक लढवणार असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची उमेदवारी ही आपणासच मिळणार आहे आणि या निवडणुकीत आपणच जिंकणार आसल्याचा विश्वास डॉ अंजलीताई घाडगे यांनी व्यक्त केला आहे.केज विधानसभा मतदारसंघात डॉ अंजलीताई घाडगे यांना गावागावातून मतदारांचा प्रचंड मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. यामुळे सध्या केज मतदारसंघात त्यांच्याच नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वरिष्ठ पातळीवरील नेते मंडळींनी देखील त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांचे वेळोवेळी कौतुक केलेले आहे. या मतदारसंघात त्यांचा मोठ्ठा जनसंपर्क तयार झाला आहे.

काल पुणे येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने विधानसभेसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत. त्यामध्ये देखील केज विधानसभेची इच्छुक उमेदवार म्हणून आपली मुलाखत उत्कृष्ट झाली असल्याचे डॉ अंजलीताई घाडगे यांनी सांगितले. याबाबत पुढे बोलताना त्या म्हणाल्या की या मुलाखतीस इच्छुक म्हणून अनेकजण आलेले असले तरी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून केज विधानसभेची उमेदवारी ही आपणासच मिळणार असून या निवडणुकीत आपणच जिंकणार आसल्याचा विश्वास डॉ अंजलीताई घाडगे यांनी आमच्या प्रतिनिधीसी बोलताना व्यक्त केला आहे.

व्हिडिओ मेकिंग स्पर्धेत शाळेचे यश!

अभिनंदनिय:काझी मुशाहेदोद्दीन प्रथम तर आफशा फ़ातेमा द्वितीय

पात्रुड/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील आदर्श जिल्हा परिषद माध्यमिक शाळा उर्दूचे प्राथमिक पदवीधर आदर्श शिक्षक काझी मुशाहेदोद्दीन अजिजोद्दीन हे नुकत्याच घेण्यात आलेल्या व्हिडिओ मेकिंग स्पर्धेत माजलगाव तालुक्यातून प्रथम तर सहशिक्षिका आफशा फ़ातेमा सय्यद फुरखान यांनी तालुक्यातून द्वितीय क्रमांक मिळवला आहे. दोघांनी मिळविलेल्या या यशामुळे त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून मोठ्या प्रमाणात शुभेच्छा दिल्या जात आहेत.

याविषयी सविस्तर वृत्त असे की, एनसीईआरटी पुणे कडून राज्यस्तरीय व्हिडिओ मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे आयोजन तालुका, जिल्हा व राज्य अशा तीन स्तरावर करण्यात आले होते. वर्ग व विषयानुसार गट तयार करून अध्ययन निष्पत्ती वर आधारित व्हिडिओ मेकिंग ची स्पर्धा शिक्षकांसाठी घेण्यात आली होती. या स्पर्धेत शाळेचे आदर्श शिक्षक काझी मुशाहेदोद्दीन आणि आफशा फ़ातेमा यांनीही भाग घेतला होता. नुकताच या स्पर्धे चा निकाल जाहीर झाला असून या स्पर्धेत काझी मुशाहेदोद्दीन हे तालुक्यातून प्रथम आले असून आफशा फ़ातेमा यांनी दुसरा क्रमांक पटकावला आहे. दोघांनी मिळविलेल्या या यशामुळे माजलगाव चे गटशिक्षणाधिकारी महामुनी, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अत्तार फातिमा, सर्व शिक्षकगण, शिक्षकेत्तर कर्मचारी, पात्रुड चे सरपंच मोमीन लतीफ भैय्या, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अय्युब भाई , शिक्षक संघटना आणि गावातील सर्व पालकांसह शाळेतील विद्यार्थ्यांनीही दोघांचे मनःपूर्वक अभिनंदन करून हृदयी शुभेच्छा दिल्या आहेत.

सक्षम होण्यासाठी उच्च शिक्षणाची गरज

जयदत्त क्षीरसागर:कालिका देवी नवरात्र उत्सव

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

तन–मन–धन हे सत्कारणी लावण्यासाठी योग्य संस्काराची गरज असून कोण कुठल्या जातीत जन्माला येईल याला महत्व नसते. पण तो स्वत: गुणवत्तेवर, इच्छेवर पुढे जाता येईल. सक्षम होण्यासाठी उच्च शिक्षण शिक्षण असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

दि.६ रोजी कालिका देवी मंदीर कालिका नगर नगर रोड बीड येथे कालिका देवी नवरात्र महोत्सवानिमित्त ह भ प भागावताचार्य अंकिता ताई खांडगे यांच्या भव्य शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे.काल रविवारी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी महापुराण कथेला भेट दिली. पुढे बोलतांना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की,स्त्री शक्तीचा जागर सुरू आहे. या उत्सवात शिवपुराण कथा सुश्राव्य स्त्री शक्ती जगाचा वेद घेवू शकते ते विज्ञानाने सिध्द केले आहे. कोणाला होणारी व्यादी आणि अस्थिर मनाला सावरायचे असेल तर परमेश्वर भक्तीच उपयोगी पडते. बारा बलुतेदारांची जागा देखील आता नवी तंत्रज्ञानाने घेतली आहे. यासाठी पुढची पिढी सक्षम करा.अमेरिकेत भारतीय वंशाचे मुले मोठ मोठ्या पदावर काम करत तेथील लोकांना रोजगार उपलब्ध करून देत आहेत. हे सगळं फक्त गुणवत्ता झाल्यामुळेच असे त्यांनी सांगितले.यावेळी भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.यावेळी रत्नाकर जवकर,पंकज अंदुरे, भालचंद्र गाडेकर,गणेश जवकर,संतोष वनगुजरे,आदी उपस्थित होते.

दुरवस्था ४२ गावात आरोग्याचा खोळंबा

बनोटी प्राथमिक आरोग्य केंद्र कुलूपबंद



"आयुष्मान आरोग्य मंदिर"
आरोग्य परमं धनम्
केंद्र-बनोटी ता.सोयगांव जि. छ.संभाजीनगर
NATIONAL RURAL HEALTH MISSION

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील ४२ गावातील नागरिकांची धुरा असलेल्या बनोटी प्राथमिक आरोग्य केंद्राला सोमवारी चक्क कुलूपबंद होते त्यामुळे आठवड्याच्या पाहिल्याचं दिवशी रुग्णांची गैरसोय झाली आहे सोमवारी दुपारी चार वाजेपर्यंत ग्रामीण भागातून उपचारासाठी आलेल्या रूग्णांना आरोग्य केंद्राला कुलुप पाहून उपचार बिना घरी जावे लागले होते

बनोटी सह परिसरातील ४२ गावांची आरोग्याची धुरा या एकमेव आरोग्य केंद्रावर अवलंबून आहे मात्र हे आरोग्य केंद्र चक्क कुलूपबंद अवस्थेत असल्याने ग्रामीण भागातून आलेल्या रुग्णांना माघारी परतावे लागले दरम्यान या आरोग्य केंद्रात एक नव्हे तर दोन दोन वैद्यकीय अधिकारी आहेत एक सुफीरा कादरी व मोना ढवळे या दोन्हीही वैद्यकीय अधिकारी गैरहजर व सर्वच कर्मचारी गैरहजर होते दरम्यान त्यामुळे आरोग्य केंद्रात बाहय रुग्ण विभाग, कार्यालयीन विभाग, औषधी वितरण आदी विभाग चक्क कुलुप बंद होते दरम्यान सध्या परिसरात वाढत्या उन्हामुळे व बदलत्या वातावरण मुळे तापेच्या रुग्णात वाढ झाली आहे खोकला, सर्दी सह रुग्ण त्रस्त आहे परंतु अशाही स्थितीत बनोटी आरोग्य केंद्र चक्क कुलुप बंद होते याची चौकशी करून वैद्यकीय अधिकारी सह सर्वच आरोग्य कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी ग्रामीण भागातील नागरुकांनी केली आहे

श्रीरामपूर आगारात प्रवासीदिन साजरा

समारंभ: शेख, नागरगोजे यांचा सन्मान

राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी श्रीरामपूर आगार येथे सोमवारी विभागीय नियंत्रक राजेंद्रजी जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवासीराजा दिन साजरा करण्यात आला.महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या परिपत्रकानुसार राज्यातील प्रत्येक आगारात प्रवासांच्या समस्या व कामगाराचे प्रश्न यांचे तातडीने निवारण होण्याच्या दृष्टीने प्रवासी राजा दिन व कामगार पालकदिनाचे कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते

श्रीरामपूर आगर येथे अहमदनगर विभागीय नियंत्रक राजेंद्र जगताप प्रवासी संघटनेचे अध्यक्ष रणजित गोड श्रीरामपूर आगार प्रमुख प्रमुख शरद खोत स्थानक प्रमुख विजय साळुंके राहुरी बस स्थानक प्रमुख विजय वाघ आदीचा प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.बस मध्ये एक मुलगी प्रवास करत असताना त्या मुलीला अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने बस चालक शकील शेख व वाहक नागरगोजे यांनी समय सुचकता दाखवत सदर मुलीला घेऊन बस हॉस्पिटल मध्ये नेऊन जीवदान दिले त्यांचा या सेवे बद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा ... पुण्यभूमी

सुविचार : . सत्य कोणत्याही कसोटीला घाबरत नाही.

स्वप्न आणि वास्तव........!

भारत लवकरच जगाची तिसरी मोठी अर्थव्यवस्था होणार, भारत लवकरच म्हणजे फार तर फार वीस वर्षात विकसित देशाच्या पंक्तीत जाऊन बसणार, अशी स्वप्ने भारताचे विद्यमान पंतप्रधान भारतीय जनतेला कायमच दाखवत आहेत. अर्थात स्वप्न पाहणे हा काही गुन्हा नाही, खरे तर मोठे ध्येय समोर असले की वाटचाल देखील तितकीच जोमाने आणि योग्य दिशेने होते. त्यामुळे विकसित भारताचे स्वप्न पाहणे गैर नाही, परंतु स्वप्न पाहणे आणि स्वप्नातच जगणे यात मूलभूत फरक आहे. भविष्यातील स्वप्नाला वर्तमानातील काहीतरी आधार लागतो. या पृष्ठभूमीवर येत्या दोन दशकात विकसित राष्ट्रांच्या पंक्तीत स्थान मिळवण्याचे स्वप्न पाहणारा भारत सध्या कुठे आहे हे पाहणे अधिक महत्त्वाचे ठरते. विकसित भारतातील स्वप्न केवळ जीडीपीच्या वाढीतून साध्य होणार नाही. सर्वसामान्य माणसापर्यंत विकासाचे फायदे पोहोचले पाहिजे आणि ते पोहोचल्याचे दिसले पाहिजे. त्यासाठी रोजगाराच्या संधी मुबलक प्रमाणात उपलब्ध होणे ही पूर्वअट आहे.

सामान्य माणसाच्या दैनंदिन आयुष्यातले प्रश्न खूप छोटे, अगदी प्राथमिक स्तरावरचे आणि म्हटले तर अतिशय सोपे असतात. नळाला रोज पाणी येते का, बसेस- ट्रेन वेळेवर धावतात का, उन्हाळ्यात पिण्याचे पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध असेल ना, आपण बनवलेल्या छोट्या मोठ्या वस्तूंना बाजारात ग्राहक मिळतील ना, अशा छोट्या मोठ्या प्रश्नातूनच सामान्य माणसाच्या अपेक्षा व्यक्त होत असतात. ज्या देशात हे सामान्य प्रश्न देखील अतिशय किचकट आणि उत्तरे त्याहून किचकट ठरत असतील त्या देशाने अल्पावधीत विकसित राष्ट्राचे स्वप्न पहावे का, हा एक मूलभूत प्रश्न आहे. देशातील विद्यमान परिस्थितीच्या पृष्ठभूमीवर सामान्य लोकांकडून परिस्थितीचे योग्य आकलन होत नसल्याचे दिसते. त्यामुळे सरकारकडे नेमकी कशाची मागणी करावी, कोणत्या मुद्द्यांवर निवडणुकीमध्ये सरकारला किंवा निवडणुकीत सहभागी राजकीय पक्षांना जाब विचारावा यात फारसा ताळमेळ असल्याचे दिसत नाही. निवडणुकांचा हंगाम जवळ आला की सामाजिक गरजांच्या वास्तववादी प्रश्नांपेक्षा भावनिक मुद्द्यांना आणि सत्ताधारी पक्षांकडून निवडणूक डोळ्यासमोर ठेवून घोषित केलेल्या तत्कालिक प्रलोभन देणाऱ्या योजनांना अधिक महत्त्व मिळत असल्याचे दिसते. दर्जेदार सार्वजनिक सेवा मिळण्यासाठी आग्रही राहण्याऐवजी शासनाकडून मिळणाऱ्या ठलाडक्या' सवलती घेण्यात सामान्य लोक धन्यता मानतात. महात्मा गांधी नेहमी म्हणायचे की देश समृद्ध व्हायचा असेल तर गाव, खेडी समृद्ध व्हायला हवीत, परंतु आज अतिशय विपरीत चित्र समोर येत आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणारा शेतकरी आज गरिबीत पिचत असल्याचे दिसते तर दुसरीकडे देशाची संपत्ती ही शंभरेक बडया व्यापारी-उद्योजक घराण्यांच्या हातात एकवटली असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाच्या असलेल्या छोटया उद्योजकांचे त्यांच्या प्रादेशिक बाजारपेठेतही स्थान कमी होऊन, बडया कंपन्यांचा बेलगाम विस्तार, हे आजचे विदारक वास्तव आहे. देशातल्या फक्त २० टक्के लोकांकडे ८० टक्के संपत्ती एकवटली आहे. उरलेली ८० टक्के लोकसंख्या ही असंघटित क्षेत्रात काम करीत आहे आणि त्यातले बहुतांश लोक तुटपुंज्या पगारावर या २० टक्के बडया लोकांची सेवा करीत आहेत. कोणत्याही मोठ्या शहरातल्या बाजारात अर्थव्यवस्थेच्या केंद्रीकरणाचे हे दृश्य अगदी सहज डोळ्यासमोर दिसते. मोजक्या कंपन्यांची मक्तेदारी व जाहिरातबाजी यांमुळे सामान्य ग्राहक ब्रँडेड पण महागडी उत्पादने विकत घेत आहे. छोटा कारखानदार जीएसटी व 'एक- राष्ट्र- एक- जटिल-नियमावली'च्या जाचात सापडलेला दिसतो. याचा परिणाम स्थानिक रोजगार व संपत्ती वितरणावर होतो. अनेक राज्यांत परप्रांतीय वर्ग वाढत आहे. प्रादेशिक समाजव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होत आहेत. प्रदूषण आणि संसाधनांवर ताण वाढत आहे. भारत उघडपणे भांडवलशाही देश नसला तरी केंद्र सरकारची धोरणे काही मोजक्या उद्योजक घराण्यांना झुकते माप देणारी आणि त्यातून स्पर्धात्मकता नष्ट किंवा कमी करणारी आहेत. परंतु केंद्राच्या मर्जीतल्या भांडवलशाहीने ना रोजगार निर्माण केले, ना सामान्य माणसाला प्रतिष्ठा दिली, ना कार्यक्षमता वाढवली आणि ना तिने जागतिक पातळीवर स्पर्धा करण्याची कुवत निर्माण केली! उलट, त्याने प्रादेशिक असमतोलच वाढत आहेत. ' सबका साथ, सबका विकास ' ही उक्ती जोपर्यंत कृतीतून समोर येत नाही, तोपर्यंत विकसित भारताचे स्वप्न पाहण्याचा अधिकार या सध्याच्या भारताला नाही.

भाकरी फिरवली, परंतु.........?

हरियाणाचे वातावरण आपल्यासाठी फारसे अनुकूल नाही, याची जाणीव भाजप नेतृत्वाला लोकसभा निवडणुकीच्या आधीपासूनच झाली होती. शेतकऱ्यांचे आंदोलन, कुस्तीपटूंचे आंदोलन आणि त्यातून बिघडलेले जातीय समीकरण हे सगळे पाहून भाजप नेतृत्वाने लोकसभा निवडणुकीपूर्वीच हरियाणात भाकरी फिरवली. मोदींचे अगदी घनिष्ट मित्र असलेल्या मनोहरलाल खट्टर यांना मुख्यमंत्री पदावरून बाजूला करीत नायब सैनी यांच्याकडे मुख्यमंत्री पदाची जबाबदारी देण्यात आली. त्यातून जातीय समीकरण जुळवण्याचा प्रयत्न भाजपने केला, परंतु लोकसभा निवडणुकीत त्याचा फारसा फायदा भाजपला झालेला दिसला नाही. मागच्या वेळी हरियाणातील सगळया दहा जागा जिंकणाऱ्या भाजपला यावेळी केवळ पाच जागांवर समाधान मानावे लागले. किमान विधानसभा निवडणुकीपर्यंत तरी परिस्थिती बदलेल ही आशा भाजप नेतृत्वाला होती, परंतु हरियाणाचा कल बघता यावेळी तिथे भाजपला सत्ता गमवावी लागण्याची दाट शक्यता आहे. मुख्यमंत्री पदावरून हटविल्यामुळे नाराज असलेले खट्टर यावेळी मनापासून विधानसभा निवडणुकीच्या प्रचारामध्ये उतरलेले दिसले नाही. त्यांनी थोडाफार प्रचार केला, परंतु अमित शहांनी भाजपची सत्ता आल्यास मुख्यमंत्री नायब सैनीच असतील असे घोषित केल्यामुळे खट्टर खट्टू झाले. त्यामुळे या विधानसभा निवडणुकीत सगळी मदार सैनींवर होती. त्यांनी ओबीसी मतदार टिकवले तर भाजप स्पर्धेत राहील. पण, भाजप नेत्यांची देहबोली बघता भाजपने आपला पराभव मान्य केल्याचे दिसते. अगदी मोदी आणि शहा देखील प्रचाराच्या शेवटच्या दिवशी हरियाणामध्ये नव्हते. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी मोदी झारखंडमध्ये तर शहा महाराष्ट्रात होते. अखेरच्या टप्प्यामध्ये उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना प्रचारात उतरवण्यात आले, योगींनी डझनभर सभा घेतल्या पण, त्यांच्या भाषणांची फारशी चर्चा झाली नाही. जातींच्या समीकरणांमध्ये हरियाणाची निवडणूक इतकी फसली आहे की मोदी, शहांसोबत तिथे योगीदेखील निष्प्रभ झाल्याचे दिसते. एकूणच भाकरी फिरवून देखील भाजपच्या ताटात काहीच पडत नसल्याचे चित्र समोर येत आहे.

स्टेट लाइन

अमितभाईंचा ऊर्जामंत्र...

डॉ. सुकृत खांडेकर
9594224000

सव्वादोन वर्षांपूर्वी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाआघाडीचे सरकार खाली खेचण्यात भाजपाने यश मिळवले, आघाडीतील शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी फूट पडली आणि ते पक्ष दुर्बल झाले. तरीही लोकसभा निवडणुकीत महाआघाडीने बाजी मारली ही भाजपाला डोकेदुखी ठरली. राज्यात भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) अशा तीन पक्षांचे मिळून महायुतीला २०० आमदारांचे समर्थन असले तरीही वेगवेगळ्या सर्वेक्षणात येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महाआघाडीचे आमदार जास्त निवडून येतील, असे अंदाज प्रकटले आहेत. महायुतीचे १२३ व महाआघाडीचे १५२ आमदार विजयी होतील, असे सर्व्हे सांगत आहेत. म्हणूनच विधानसभा निवडणुकीत महायुतीचे काय होणार? हा प्रश्न मौल्यवान बनला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे महाराष्ट्रातील परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहेत. अमित शहा यांनी मुंबईत दादर आणि वाशी येथे प्रमुख कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर मार्गदर्शन केले. यावेळी राज्यात महायुतीचे सरकार येईल; पण सन २०२९ मध्ये भाजपा स्वबळावर सत्तेवर येईल, असे भाकीत त्यांनी केले. अमित शहा देशाचे गृहमंत्री आहेत. राज्यातील राजकीय परिस्थिती व लोकांची मानसिकता कशी आहे, याचे गुप्तचर यंत्रणांचे अहवाल थेट त्यांना मिळत असतात. शिवाय पक्षाची स्वतंत्र यंत्रणा आहेच. निवडणुकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शिस्तबद्ध केडर भाजपाच्या प्रचारासाठी नेहमीच सज्ज असते. राज्यात विधानसभा निवडणूक नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात अपेक्षित आहे. म्हणूनच भाजपाचे चाणक्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमितभाईंचे मार्गदर्शन पक्षासाठी मौल्यवान होते. महाराष्ट्र हे भाजपाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे राज्य आहे. देशाची आर्थिक राजधानी या राज्यात असून पुरोगामी व प्रगतिशील महाराष्ट्राची सत्ता भाजपाच्या हाती राहिली पाहिजे, यावर नरेंद्र मोदी, अमित शहा व जे. पी. नड्डा यांचा कटाक्ष आहे. म्हणूनच लोकसभा निवडणुकीनंतर अपयशाने निराश झालेल्या नेत्यांना, पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना ऊर्जा देण्यासाठी अमितभाईंनी महाराष्ट्रात व मुंबईत कार्यकर्त्यांचे मेळावे घेतले. काहीही करा पण सत्ता परत आणा, असे अमितभाईंनी कार्यकर्त्यांना आवाहन केले. देवेंद्र फडणवीस सक्षम आहेत, त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपा निवडणूक लढवेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भारतीय जनता पक्षाची स्थापना दि. ६ एप्रिल १९८० रोजी मुंबईत झाली. पक्षाची चार दशकांची वाटचाल ही अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी आदी ज्येष्ठ नेत्यांच्या नेतृत्वाखाली झाली; पण नरेंद्र मोदी व अमित शहा यांचा देशाच्या राजकीय क्षितीजावर प्रवेश झाल्यापासून भाजपाची देशभर घोडदौड सुरू झाली. देशात गेल्या दहा वर्षांत एकवीस राज्यांत भाजपाची सत्ता आली; पण भाजपाच्या स्थापनेपासून गेल्या चव्वेचाळीस वर्षांत महाराष्ट्रात भाजपाची एकदाही स्वबळावर सत्ता स्थापन झाली नाही. आज देवेंद्र फडणवीस हाच भाजपाचा महाराष्ट्राचा चेहरा आहे. अर्थात मोदी व शहा यांचा फडणवीसांवर वरदहस्त आहे, म्हणून राज्यात फडणवीस हे भाजपाचे नंबर १ नेते आहेत.

सन २०१४ मध्ये देशात अनेक राज्यांत भाजपाची सत्ता आली. महाराष्ट्रात विधानसभेत १४४ हा बहुमताचा जादुई आकडा आहे. त्या निवडणुकीत भाजपाचे १२२ आमदार निवडून आले व नंतर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे समर्थन घेऊन भाजपाने पाच वर्षे युतीचे सरकार चालवले. अर्थातच त्या सरकारवर पूर्ण वर्चस्व भाजपाचे म्हणजे देवेंद्र फडणवीस यांचेच होते. २०१९ च्या निवडणुकीत भाजपाने ठाकरे यांच्या शिवसेनेची युती करून निवडणूक लढवली, पण पक्षाचे १०५ आमदार निवडून आले. आता २०२४ मध्ये एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजितदादांची राष्ट्रवादी काँग्रेस यांना बरोबर घेऊन भाजपा निवडणुकीच्या रणसंग्रामात उतरली आहे. मी पुन्हा येईन... असे २०१९ च्या निवडणूक प्रचारात देवेंद्र फडणवीस वारंवार सांगत होते, विरोधी पक्षांनी त्याची बरीच टिंगल-टवाळी केली, पण निकालानंतर देवेंद्र यांनी मुख्यमंत्री म्हणून व अजितदादांनी उपमुख्यमंत्री म्हणून सर्वात अगोदर शपथ घेतली; पण त्यांचे सरकार जेमतेम ८० तासच टिकले. त्यांचा पहाटेचा शपथविधी बरेच दिवस गाजत राहिला.

गेल्या दहा-अकरा वर्षांत काँग्रेस- राष्ट्रवादी काँग्रेसमधून अनेक दिग्गज नेते भाजपामध्ये आले. त्यांची यादी बरीच मोठी होईल, पण त्यामुळे भाजपाचा राज्यात विस्तार झाला. अनेक नेते चौकशीचा ससेमिरा चुकविण्यासाठी भाजपामध्ये आले, तर अनेकजण सत्तेच्या मोहापायी आले. असे असूनही लोकसभा निवडणुकीत मतदारांनी महाआघाडीचे (विरोधी पक्षांचे) ३१ खासदार निवडून दिले व भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी या महायुतीच्या १७ जणांना विजयी केले.

केंद्रात व राज्यात भाजपाचे सरकार असताना महायुतीला मोठा फटका बसला. भाजपाचे अगोदरच्या लोकसभेत २३ खासदार होते, यंदा केवळ नऊच विजयी झाले. केवळ भाषणबाजी करून नि घोषणांचा पाऊस पाडून, तसेच विरोधकांच्या पाठी ईडी-सीबीआय लावून मते मिळत नाहीत, हे आता लक्षात आले असावे. सत्तेत असलेल्या दोन प्रमुख पक्षांची केलेली तोडफोड जनतेला आवडलेली नाही, हा संदेश लोकसभा निकालाने दिला आहे. येत्या निवडणुकीत मोदींचा करिष्मा व दीड कोटी लाभार्थी लाडक्या बहिणी हाच आता महायुतीचा प्रमुख आधार आहे.

लोकसभेतील अपयश विसरा व उमेदीने कामाला लागा. प्रत्येक बूथवर २० सदस्य करा, प्रत्येक बूथवर १० कार्यकर्ते हवेत. मतदान १० टक्के वाढले पाहिजे. विधानसभेला फाजिल आत्मविश्वास असता कामा नये. गटबाजी टाळा, एकमेकांच्या विरोधात बोलू नका, वादग्रस्त विधाने टाळा, विरोधकांच्या फेक नॅरेटिव्हला लगेच उत्तर द्या, आदी सूचना पक्षाच्या मेळाव्यात कार्यकर्त्यांना करण्यात आल्या. काहीही करा, फोडाफोडी करा पण सत्ता आणा, असेही आव्हान करण्यात आले.

लोकसभा निवडणुकीत अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची मते भाजपाकडे वळली नाहीत म्हणून भाजपाचे नुकसान झाले, असा युक्तिवाद अगोदर संघाच्या मुखपत्राने केला व नंतर स्वतः फडणवीस तेच बोलू लागले. त्याच अजितदादांना बरोबर घेऊन भाजपा विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरत आहे. आपले १०५ आमदार सांभाळा आणि मित्रपक्षांचेही रूसवे-फुगवे काढा, अशी कसरत भाजपाला करावी लागते आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या संस्काराच्या मुशीतून तयार झालेले मनोहर जोशी, नारायण राणे, एकनाथ शिंदे, असे राज्याचे तीन मुख्यमंत्री झाले. वडिलांच्या पुण्याईचा लाभ उद्धव ठाकरे यांनाही मिळाला, पण भाजपाला आजवर (देवेंद्र फडणवीस) एकदाच मुख्यमंत्रिपद मिळाले. सर्वाधिक आमदार असूनही गेल्या पाच वर्षांत भाजपाला (८० तास वगळून) मुख्यमंत्रिपद नव्हते. नोव्हेंबरमध्ये महायुतीला बहुमत मिळाले, तर पुढचे मुख्यमंत्रिपद कोणाला हे मात्र अजून गुलदस्त्यात आहे. पुन्हा एकनाथ शिंदे, की देवेंद्र फडणवीस, की पाच वेळा उपमुख्यमंत्री झालेले अजितदादा?

भाष्य

मराठीचे संवर्धन करणे आपलीच जबाबदारी!

जगन घाणेकर
9664559780

जगभरातील मराठी जनांना गेल्या अनेक दशकांपासून ज्याची प्रतीक्षा होती तो दिवस अखेर उजाडला. केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला. अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी जे निकष असतात ते पूर्ण झाल्याने हा दर्जा मराठी भाषेला मिळाला आहे. अभिजात दर्जा असलेल्या भाषा अधिक समृद्ध होण्यासाठी केंद्र सरकारकडून दरवर्षी सुमारे ३०० कोटी रुपयांचे अनुदान दिले जाते. ते आता मराठी भाषा संवर्धनासाठी मिळणार आहे. भाषा भवन उभारणे, त्या भाषेतील ग्रंथ आणि साहित्याचा प्रसार करणे, ग्रंथालये उभारणे, देशभरातील विद्यापीठे किंवा अन्य संस्थांमार्फत भाषेचा प्रसार यांसह इतर प्रकल्पांसाठी सरकारकडून आर्थिक पाठबळ दिले जाईल. अभिजात भाषेचा दर्जा असलेल्या भाषेतील विद्वानांसाठी दरवर्षी दोन राष्ट्रीय पुरस्कार जाहीर केले जातात. आता मराठी विद्वानांनाही हे पुरस्कार मिळतील. मराठीसाठी 'सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर स्टडिज'ची स्थापना केली जाईल. भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये आता मराठी भाषा शिकण्याची व्यवस्था केली जाईल. मराठीतील प्राचीन ग्रंथांचा अनुवाद केला जाईल. असे बरेच लाभ मराठी भाषेला आता अधिकृतरीत्या मिळतील. आजमितीला जागतिक पातळीवर सात हजारांहून अधिक मातृभाषा आहेत, तर केवळ भारतात २२ प्रमुख भाषांसह सुमारे १३०० मातृभाषा आहेत. झपाट्याने होणारे जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि अन्य भाषांनी मातृभाषेवर केलेली कुरघोडी, यांमुळे अनेक मातृभाषा लोप पावत चालल्या आहेत. सर्वाधिक भाषा बोलले जाणारे भारत हे जगातील एकमेव राष्ट्र असून भारतातही काही मातृभाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत, तर काहींचा व्यवहारात होत असलेला वापर कमी होत चालला आहे. २१ फेब्रुवारीला जागतिक मातृभाषा दिन आणि २७ फेब्रुवारीला मराठी राजभाषा दिवस म्हणून राज्यात उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी समस्त मराठी भाषिक मंडळींकडून व्हॉट्सॲप वर मराठी भाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या जातात, मराठी भाषेचे गोडवे गाणाऱ्या कविता, गाणी आणि सुविचार सामाजिक माध्यमांच्या स्टेट्स आणि स्टोऱ्यांवर ठेवले जातात. काही मंडळी या दिवशी एकमेकांशी आवर्जून मराठीत संवाद साधतात. सामाजिक संस्था, मंडळे, राजकीय पक्ष विविध उपक्रम राबवतात आणि त्यानिमित्ताने मराठी भाषेचे महत्त्व सांगणारी व्याख्याने दिली जातात. २७ फेब्रुवारीला शाळांतूनही मराठी राजभाषा दिवस उत्साहाने साजरा केला जातो, येणारा मराठी राजभाषा दिवस अधिक उत्साहाने साजरा होईल यात शंका नाही. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा तर मिळाला; मात्र तिचे संवर्धन आणि जतन करण्याची जबाबदारी आपलीच आहे, याचा विसर आपल्याला पडता कामा नये. आजमितीला मराठी भाषेची स्थिती पाहिल्यास दहापैकी ३ जणांना तरी शुद्ध मराठीत दहा ओळी म्हणता येतील का, हा प्रश्न आहे.

इंग्रजी भाषेने मातृभाषांवर केलेली घुसखोरी ही आज एक जटील समस्या बनली आहे. व्यवहारात पुढे जायचे असेल, तर इंग्रजीला पर्याय नाही हा मोठा गैसमज भारतीय जनतेत निर्माण झाल्यामुळे आज इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये आपल्या पाल्यांना घालणाऱ्यांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. महाराष्ट्रात त्यातही राज्यातील प्रमुख शहरांमध्ये हे प्रमाण वर्षागणिक वाढू लागले आहे, पाल्यांना इंग्रजी भाषा शिकण्यासाठी आणि त्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व निर्माण होण्यासाठी पालकांकडून अतिरिक्त शिकवण्या लावल्या जातात. इंग्रजी भाषेचा सराव व्हावा यासाठी घरातही मुलांना इंग्रजीत संवाद साधण्याची सक्ती केली जाते. परिणामी मातृभाषा मराठी असूनही अशा मुलांना मराठी भाषा परकीय वाटू लागते. मराठी भाषेचे सौंदर्य आणि त्यातील पैलू यांना कधी उमगतच नाहीत. लहानपणापासूनच परकीय भाषेचे कित्ते गिरवल्याने मातृभाषेतील परवलीचे शब्द वगळता अन्य शब्दांचे ज्ञान या पिढीकडे मुळातच नसते. मातृभाषेतील शब्दभांडार, त्यातील सौंदर्य आणि त्यातील लेखन संपदा यांपासून ही पिढी दुरावू लागली आहे. हे असेच चालू राहिले, तर येणाऱ्या काही वर्षांत मराठी मातृभाषा औषधालाही शिल्लक राहील का, हा प्रश्नच आहे. मातृभाषेच्या संवर्धनासाठी व्यावहारिक पातळीवर इंग्रजीचे वाढलेले अवास्तव महत्त्व कमी करण्याची आवश्यकता असून राज्य पातळीवर मातृभाषेचाच अधिकाधिक वापर केला जायला हवा आणि त्यासाठी मातृभाषेविषयी पालकांमध्ये जागृती होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

मूळ मराठी भाषेवर देववाणी संस्कृतचा प्रभाव असल्याने ती अधिक समृद्ध आणि प्रगल्भ आहे. तिच्या प्रत्येक शब्दामध्ये अर्थ दडलेला आहे. राज्यातील संस्कृतीवर आरंभी इस्लामी आणि नंतर इंग्रजी आक्रमकांनी हल्ले केल्यामुळे येथील सध्याच्या बोली भाषेवर उर्दू आणि इंग्रजी भाषेचा प्रभाव अधिक जाणवतो. आपल्या नेहमीच्या बोलण्यातही एका वाक्यात दोन ते तीन परकीय शब्द आपण सहजपणे उच्चारत असतो. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वप्रथम तिच्याविषयी आपल्या मनात प्रेम निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. आणि प्रेम तेव्हाच निर्माण होईल जेव्हा दैनंदिन व्यवहारात आपण तिचा अधिकाधिक वापर करू. वापर करणे म्हणजे केवळ मराठी बोलणे नव्हे, तर दैनंदिन व्यवहारात परकीय शब्द टाळून शुद्ध मराठी बोलणे. काही वस्तूंची निर्मितीच गेल्या काही वर्षांत झाली असल्याने त्यांना पर्यायी मराठी शब्द सध्यातरी नाहीत, असे शब्द वगळता ज्या ज्या शब्दांना पर्यायी मराठी शब्द आहेत, त्यांचा वापर तर आवर्जून केला पाहिजे. आपल्या पाल्यांना स्वभाषेचे संस्कार घरातून नियमितपणे दिले गेले पाहिजेत. पाल्यांशी घरामध्ये शुद्ध मराठी भाषेतच संवाद साधायला हवा. त्यासाठी मुलांना सर्वप्रथम 'मम्मी-डॅडी' ऐवजी आई-बाबा बोलायला लावा. भ्रमणध्वनीवर बोलताना 'हॅल्लो' ऐवजी 'नमस्कार' बोलण्याची सवय स्वतःला लावून घ्या. 'गुड मॉर्निंग-गुड नाईट' ऐवजी सुप्रभात-शुभरात्री बोलण्याची सवय लावा. आपले सण पारंपरिक पद्धतीने साजरे करून मित्र मंडळींना, आप्तेष्टांना सणांच्या शुभेच्छा मराठीतून द्या, आपली स्वाक्षरी मराठीतून करा. दारावरील पाटी मराठीतून लावा. आपल्या भाषेचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. ते फेडायचे असतील तर तिचे संवर्धन करणे आणि तिचा दैनंदिन व्यवहारात अधिकाधिक वापर करणे काळाची गरज आहे. केवळ अभिजात दर्जा मिळालेला म्हणून मराठीला लागलेली अवकळा थांबणार नाही.

घाटकोपर, मुंबई

मनाचिये गुंती

गृहिणींचे वेळापत्रक

वैशाली पाटील
9420350171

आपल्या प्रत्येकाच्याच आयुष्यात वेळापत्रकाचे महत्त्व अनन्यसाधारण असते. प्रत्येक सर्वसाधारण माणसाची एक सामान्य दिनचर्या असते. ज्याचे काटेकोर पालन करूनच ते आयुष्यात प्रगती करू शकतात. एकंदरीत आपण सर्वच आपल्या एका ठराविक वेळापत्रकाचे पालन केल्याशिवाय आपल्या चोवीस तासांना उत्पादनक्षम बनवू शकत नाही. अन्यथा आपल्या आयुष्यातून तो क्षण कायमचा वजा होतो व निरर्थक जातो; परंतु असा एक वर्ग आहे ज्याचे कोणतेही ठरलेले वेळापत्रक नसते. या वर्गाला दिवसभरातील तास कमी पडतात. तो इतरांच्या वेळापत्रकानुसार आपले वेळापत्रक बदलवितो. ह्या जगावेगळ्या वर्गाचे नाव आहे ''गृहिणी''. गृहिणींना आपल्या घरासाठी व आपल्या माणसांसाठी त्यांनी कितीही केले तरी कमीच वाटते. त्यांना आपले विशिष्ट असे वेळापत्रक असावे, असे वाटतच नाही.

घर म्हणजे स्त्रियांचे हक्काचे क्षेत्र असते. त्या आपल्या दिनचर्येत घरासाठी एक वेळापत्रक बनवित असतात; मात्र केवळ घरातील कामांच्या व आपल्या माणसांच्या महत्त्वाच्या वेळाच यात टिपलेल्या असतात. स्वतःसाठी मात्र कोणतीही वेळ ठरविलेली नसते, कारण ते करणे त्यांना महत्त्वाचे वाटत नाही. आणि आपणही कधी त्याविषयी दखल घेत नाही. घरातील एक माणूस दिवसरात्र फक्त सर्वांचाच विचार करत असतो, सर्वांच्या खाण्यापिण्यापासून सगळ्या आवडी-निवडी जपण्यासाठी झटत असतो; परंतु तिची ही निरपेक्ष घोडदौड आपण अगदी सहजपणे आपल्या नजरेआड करत असतो. ह्याचा अर्थ सर्वस्वी हाच होतो, की नशीबाने आपल्याला एक असे सोन्यासारखे माणूस लाभलेले असते जे हसत-हसत आपल्यासाठी समर्पण करण्यास तयार आहे; परंतु आपण मात्र त्याला आपला सेवक समजत आहोत. खरतर गृहिणीच्या संयमाची दाद द्यावीशी वाटते, की त्या आजीवन अशा स्थितीतही स्वतःला निश्चल ठेवू शकतात.

खरेतर गृहिणीच्या ह्या निरपेक्ष समर्पणाकरिता घरच्यांनी कायम त्यांचे ऋणी असले पाहिजे. स्त्रियांना आपला संयम पणास लावावा लागतो. कोणतीही गृहिणी कधीही आपले घर व आपल्या माणसांअगोदर स्वतःचा विचार करत नाही. म्हणूनच त्यांचे वेळापत्रक घरच्यांसाठी सोयीस्कर असते; पण स्त्रियांनी सक्षम व्हावे, असे आपणास वाटत असेल, तर त्यांचा वेळ कसा उत्पादनक्षम बनविता येईल ह्या विषयावर आवर्जून दृष्टिक्षेप टाकला गेला पाहिजे. घराचा कणा मजबूत ठेवायचा असेल, तर गृहिणींचे आरोग्य जपले गेले पाहिजे. घर हे गृहिणींचे कार्यक्षेत्र असल्यामुळे त्यांना आपल्या ठरलेल्या वेळापत्रकानुसार आपली दैनंदिन कामेही उरकायची असतात. त्यामुळे गृहिणींना व त्यांच्या वेळेला गृहीत धरणेच सोडले पाहिजे. 'ती घरीच तर असते', अशी वाक्ये सहजच तोंडून काढण्याअगोदर त्यांचे गृहिणी असलेल्या स्त्रियांच्या मनावर काय परिणाम होऊ शकतात ह्या गोष्टीचा नक्कीच सखोल विचार केला गेला पाहिजे. तेव्हा गृहिणींच्या वेळेचा आपल्या हिशोबाने वापर करणे आता कोठेतरी थांबविले पाहिजे. तेव्हाच त्यांच्या स्वप्नांची, त्यांच्या कल्पनाशक्तीची, तसेच त्यांच्यातील क्षमतांची पुन्हा भरभराट होईल. ज्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व उजळून निघेल. त्यांनी जर स्वतःसाठी राखीव वेळ ठेवलेला असला, तर त्यांच्या निर्णयाचा नेहमी सन्मान करावा. त्यांना वेळेची मुभा देऊन, त्यांची बाजू सांभाळून घेऊन त्यांचे सहकार्य केले पाहिजे.

वेळापत्रक बनविण्याचा अर्थच हा असतो, की आपल्या वेळेला एक योग्य दिशा व उद्देश मिळावा. त्याप्रमाणे वेळापत्रकानुसार आयुष्यात मार्गक्रमण करणारा व्यक्ती महत्त्वाकांक्षी असतो. गृहिणींना त्यांच्या आयुष्यात वेळापत्रकाचे महत्त्व कळले असेल, तर ते त्यांच्या हिताचे व त्यांच्यासाठी प्रगतीचे द्वार उघडणारे कसे ठरू शकते ह्याविषयी त्यांचे मार्गदर्शन करण्यात आले पाहिजे. त्यांनी जर आपल्या वेळेला शिस्त लावली, तर त्यांना स्वतःमध्येच एका प्रबळ उर्जेची जाणीव होऊ शकते. त्याचबरोबर त्या त्यांच्या कोणत्याही वयात व कशाही परिस्थितीत आपली कारकीर्द सुरू करण्याच्या दिशेने यशस्वी वाटचालही करू शकतात. म्हणूनच गृहिणींनी वेळापत्रक बनविताना त्यात स्वतःलाही महत्त्व दिले पाहिजे, कारण त्यांचा वेळ कसा व्यतीत होतो त्याचप्रमाणे कशाप्रकारच्या संगतीत व्यतीत होतो ह्या दोन गोष्टी त्यांचे सक्षम व उज्ज्वल भविष्य घडण्यासाठी फार महत्त्वाच्या असतात.

स्त्रिया आपल्या पदरात आपल्या माणसांची स्वप्न व इच्छांना सजवून व प्रेमाने जोपासून ठेवत असतात आणि ती स्वप्न पूर्ण व्हावीत म्हणून आपल्या वेळेची व भावनांची गुंतवणूक आजीवन त्यात करत असतात. हा स्त्रियांच्या समर्पणाचा भाग आहे; परंतु जेव्हा गृहिणी स्वतःचे वेळापत्रक बनविण्याचे धाडस करतात तेव्हा त्यांच्या आयुष्यात सकारात्मकरित्या हालचाल होते. त्याचे वेगळे व्यक्तिमत्त्व तयार होते, कारण त्यावेळी त्यांना स्वतःची किंमत कळलेली असते.

वाचक विचार मंच

स्वच्छतेच्या बाबतीमध्ये ग्रामीण भाग दुर्लक्षित!

शासन ग्रामविकासासाठी व जनतेच्या हितासाठी कटिबद्ध आहे; मात्र ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात शासनिधी येऊनही दर्जात्मक व पारदर्शक विकासकामे होत नाहीत. यामुळे ग्रामीण भागात भ्रष्टाचार पसरायला वेळ लागत नाही. आज स्वच्छतेच्या बाबतीमध्ये ग्रामीण भागात दुर्लक्षच झाल्याचे दिसून येते. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी केवळ सर्वत्र गाजावाजा होताना दिसतो. शहरात स्वच्छता होत असली, तरी ग्रामीण भागात मात्र अस्वच्छतेचा कळसच पहायला मिळतो. स्वच्छतेच्या बाबतीमध्ये शासनाच्या डझनभर योजना कार्यान्वित आहेत, मात्र या योजनांचा परिणाम ग्रामीण भागात फारसा झालेला दिसून येत नाही, हे वास्तव आहे. आजही यासंबंधीची कामे थातुरमातूर पध्दतीने उरकून शासनदप्तरी केवळ शासननिधी खर्च झाल्याचे आढळून येते. शासनस्तरावर याबाबत विचारविनिमय करण्याची नितांत आवश्यकता आहे. ग्रामीण भागाचा विकास खऱ्या अर्थाने साधायचा झाल्यास व्यापक जनजागृती बरोबरच याकामी एकत्रितपणे लोकसहभागाबरोबर शासनाचाही पुढाकार असणे गरजेचे आहे. तेव्हाच ग्रामीण भागातील अस्वच्छतेचा कळस कमी होईल.

- सचिन ज. नागरे,
मु. पो. किनगाव जट्टू, ता. लोणार,
जि. बुलढाणा
मो. नं.: ९६०४३२१४३२

कौल कुणाला?

एकतर्फी होईल म्हणतात
हरियाणाची निवडणूक
म्हणूनच 'कमळा'ईच्या
'परिवारा'ची वाढली धाकधूक

मजबूत पकड आहे
म्हणतात यंदा 'हातां'ची
मतदारांनी उधळण
केली आहे मतांची

पुन्हा एकदा सत्तेत
येणार आहे 'आय'
निकाल लागल्यावर कळेल
कुणाचे होणार काय

जनतेच्या मनात काय
हे सांगता येत नाही आज
बघू या कुणाचे किती
खरे ठरतात अंदाज

ॲड. अनंत खेळकर
अकोला

संवाद

पक्षांतरे करण्याची किंमत मोजावी लागणार!

राज्य विधानसभा निवडणुकीचा काळ जवळ आला आहे हे ओळखून आपल्याला उमेदवारी मिळणार नाही किंवा मतदारसंघ बदलला जाईल किंवा आपल्या पक्षाचे काही खरे नाही, अशा प्रकारच्या अपेक्षांनी अनेकांकडून राजकीय पक्ष बदलणे या काळात सुरू होत असते. पक्षाचे तिकीट मिळविण्यात जेव्हा साशंकता निर्माण होऊन काही संभाव्य उमेदवार वैयक्तिक स्वार्थासाठी पक्ष सोडून उघडपणे किंवा गुपचूपपणे विरोधातल्या उमेदवाराला पाठिंबा देणे पत्करतात, त्यांना दलबदलू अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. अशा दलबदलूंना उमेदवारी जाहीर करून राजकीय पक्ष आपल्या विरोधी पक्षांवर कुरघोडी करण्याची संधी साधतात. यावेळी पक्षावरची निष्ठा आणि मागील काळात केलेले पक्षकार्य विसरून बाहेरच्यांना दिलेल्या उमेदवारीने नाराज झालेले एकनिष्ठ कार्यकर्ते दुरावतात, ज्यांची नाराजी मतदानावर परिणाम घडवून आणण्यास कारणीभूत ठरते. कारण काही राजकीय पक्षांकडून त्यांच्या विश्वासार्ह सेवकांना तिकिटे नाकारली जाऊन त्यांचे विरोधी पक्षांमध्ये जाण्याचे मार्ग मोकळे केले जातात. ह्या साऱ्या निवडणुकीपूरत्या जाणीवपूर्वक समझोते केलेल्यांचे निवडणूक निकालानंतर पितळ उघडे पडते. देशासह महाराष्ट्रातील मतदारांत सुशिक्षित आणि तरुण युवकांचा सहभाग वाढत आहे.

जे मतदार विचार करून मतदान करताना नेत्यांच्या भाषणबाजीला ऐकून घेतात आणि आपला स्वतंत्र हक्क बजावण्यासाठी मतदान करताना दिसत आहेत त्यामुळेच मतदानाचा टक्का वाढण्याच्या शक्यता अधिक आहेत. अशा बऱ्याच प्रकारांचा अभ्यास केलेल्या महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांनी राजकीय पक्षांनी विधानसभा निवडणुकीत उमेदवारी देण्यापूर्वी काही निकष जपण्याची आणि विचारविनिमय करण्याची आवश्यकता आहे, असे आवाहन केले आहे. गेल्या काही वर्षांपासून निवडणुकांमधील मूल्यांचे आणि नैतिकतेचे राजकारण संपविले गेले आहे आणि त्यांना राज्याच्या राजकारणात पुन्हा मूल्ये आणि नैतिकता रुजविण्याची भूमिका पार पाडण्यासाठी सांविधानिक जबाबदारी निभावण्याची अपेक्षा आहे. तसे करण्याने मूल्ये आणि निष्ठेचा आदर राखला जाईल व मतदानात वाढ होईल. वैयक्तिक स्वार्थासाठी पक्षांतरे करणाऱ्यांवर वचक निर्माण होण्यास मदत होईल, असे मत व्यक्त केले आहे. तुषार गांधी यांच्या आवाहनास राजकीय पक्ष, पक्षनेते आणि मतदार यांच्याकडून किती प्रतिसाद मिळाला हे निवडणूक निकालानंतर स्पष्ट होईल.

राजन पांजरी
जोगेश्वरी पूर्व, मुंबई, मो. नं.: ९८१९७००८१८

गुल्लेर

तूच लाव



नरेंद्र इंगळे
9561226572

'साहेब आहेत काय घरी?'

'कोन आहे?'

'मी एमटेक कंपनीचा एजंट आहो.. प्रॉडक्ट दाखवाले आलो.'

'मले काही ना पाह्यजे.'

'पाहून त घ्या.. हे बॉटल पाहा.. आम्लपित्त, बिपी, शुगर.. सरदर्द.. रोजची एक गोळी घ्या लागते.. किंमत फक्त अठराशे रुपये.. अमित शहा हेच गोई घेतात.'

'त्यालेच दे.. लुटून राह्यला काय बे?'

'कंपनी इंटरनॅशनल आहे. विदेशातून माल येते. हे पहा पुस्तक.'

'मले पुस्तक दाखवू नको.'

'तुमची खात्री पटली पाह्यजे.. हे मॅडमसाठी क्रीम घ्या.. आठ दिवसात बाई गोरी होते.'

'पलट्या मारु नको.. अशी कोनतीच क्रीम नाही. असं झालं असतं तर दक्षीन आफ्रिकेतल्या लोकाईनं हेच क्रीम वापरली असती.'

'कॉलिटीचा फरक आहे. हे फक्त हायफाय लोकं वापरतात. निता अंबानी हेच वापरते. फक्त पाचशे वीस रुपये.'

'चिवत्या समजून राह्यला काय? शंभराची वस्तू पाचशात विकून राह्यला?'

'बरं हे साबन घ्या. पंचाहत्तर रुपयाचं.'

'यात काय विशेष आहे?'

'हे एकडाव लावलं की दिवसभर आंगाचा वास जात नाही.'

'लय महाग आहे तुव्ह सामान.'

'मंग तुम्ही एजंट व्हा.'

'एजंट होऊन काय करु?'

'घरोघरी फिरत जा.. तुमाले तीस टक्के कमिशन भेटते.. धंदा वाढला की अमेरिका, सिंगापूरचा मोफत प्रवास.. फाईव्ह स्टार हाटेलात मुक्काम.'

'तू किती दिवसाचा धंदा करुन राह्यला?'

'अडीच वर्षे झाले.'

'तू गेलता काय अमेरिकेले?'

'आजून गेलो नाही.'

'मंग कायले चाटा मारुन राह्यला?'

'चाटा नाहीत. मुंबईच्या एका एजंटनं आताच अठरा लाखाची गाडी घेतली.. हा पाहा तो मानूस.'

'तो फोटो तुह्यापाशीच ठेव.. हे क्रीम तूच लाव अन गोरा व्हय.. आला तसा वापस जाय.. मी फाटक लाऊन घेतो.'

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

डबल इंजिन सरकार म्हणजे दुहेरी लूट

अरविंद केजरीवाल यांचे प्रतिपादन

देशोन्नती वृत्तसंकलन



नवी दिल्ली: डबल इंजिन सरकार म्हणजे दुहेरी लूट आहे. गेल्या सात वर्षांपासून यूपीमध्ये दुहेरी इंजिनचे सरकार आहे, पण ते अपयशी ठरले आहे. दिल्लीतील जनतेचे प्रेम, पाठिंबा आणि विश्वास माझ्या प्रामाणिकपणाचा पुरावा ठरेल, असे प्रतिपादन आम आदमीए पक्षाचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी म्हटले आहे.

दिल्लीतील छत्रसाल स्टेडियमवर आम आदमी पक्षातर्फे जनता की अदालत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जनतेला संबोधित करताना अरविंद केजरीवाल म्हणाले की, २२ राज्यांमध्ये त्यांची (भाजप) सरकारे आहेत. तुम्ही त्यांना एका राज्याचे नाव सांगा जिथे त्यांनी वीज मोफत दिली आहे. ते ३० वर्षांपासून गुजरातमध्ये सत्तेत आहेत.

जम्मू-काश्मीरमध्ये भाजप सरकार स्थापन करेल- ब्रिजभूषण

देशोन्नती वृत्तसंकलन

नवी दिल्ली: हरियाणा आणि जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुका पूर्ण झाल्या आहेत. आता आठ निवडणुकांचे निकाल जाहीर होणार आहेत. पण त्याआधी सर्व एक्झिट पोल जम्मू-काश्मीरमध्ये काँग्रेस-एनसी युती आणि हरियाणामध्ये काँग्रेस सरकार स्थापन करण्याचा दावा करत आहेत. याबाबत सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या प्रतिक्रिया उमटत आहे. यात भारतीय कुस्ती महासंघाचे माजी प्रमुख आणि भाजप नेते ब्रिजभूषण शरण सिंह यांचे वक्तव्यही समोर आले आहे. त्यांना विचारण्यात आले की, हरियाणा आणि जम्मू-काश्मीरमध्ये सरकार कोण बनवेल, यावर ते म्हणाले की, जम्मू-काश्मीरमध्ये भारतीय जनता पक्ष (भाजप) सरकार स्थापन करेल.

नदीत आंघोळीसाठी गेलेल्या ७ मुलांचा बुडून मृत्यू!

देशोन्नती वृत्तसंकलन

रोहतास : जिल्ह्यातील तुंबा गावातून एक हृदयद्रावक बातमी समोर आली आहे. येथे सोन नदीत आंघोळ करताना सात मुलांचा बुडून मृत्यू झाला, त्यापैकी पाच मुलांचे मृतदेह सापडले आहेत तर दोन मुलांचा शोध सुरू आहे. सर्व मुले एकाच कुटुंबातील असल्याचे सांगण्यात येत आहे. या अपघातानंतर संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. रविवारी सकाळी कृष्णा गोंड यांची चार मुले आणि त्यांच्या बहिणीच्या मुलीसह सात मुले आंघोळीसाठी सोन नदीवर गेले होते. आंघोळ करत असताना

दोन बेपत्ता मुलांचा शोध सुरू

अचानक सर्व मुले खोल पाण्यात गेली आणि बुडू लागली. स्थानिक लोकांनी तातडीने घटनास्थळ गाठून पाच मुलांचे मृतदेह बाहेर काढले, मात्र दोन मुले अद्याप बेपत्ता आहेत. प्रत्यक्षदर्शी गोलू कुमार यांनी सांगितले की, आम्ही सोन नदीत आंघोळीसाठी गेलो होतो. आंघोळ करत असताना एक मुलगा बुडू लागला. त्याला वाचवण्यासाठी आम्ही सर्वांनी पाण्यात उड्या मारल्या, पण आम्ही स्वतःही बुडू लागलो.

तिरुपती : येथील भगवान व्यंकटेश्वर मंदिरातील लाडू प्रसादाची गुणवत्ता वाढल्याबद्दल भाविकांनी समाधान व्यक्त केल्याचा दावा आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी केला.

चीनने अमेरिकन न्यायालय प्रणाली केली हॅक!

चीनच्या मंत्रालयाचा प्रतिसाद नाही

देशोन्नती वृत्तसंकलन



वॉशिंग्टन : चिनी हॅकर्सनी अमेरिकन ब्रॉडबँड प्रोव्हायडर नेटवर्क हॅक करून खळबळ उडवून दिली आहे. फेडरल सरकार कोर्ट-अधिकृत वायरटॅपिंगसाठी मिळवलेली माहिती वापरते. वॉल स्ट्रीट जर्नल नुसार, चीनने अमेरिकन कोर्टाची संपूर्ण वायरटॅप प्रणाली हॅक केली आहे. डब्ल्यूएसजेने या प्रकरणाशी परिचित असलेल्या अनेक लोकांचा हवाला देत म्हटले आहे. अमेरिकेतील Verizon Communications, AT&T आणि Lumen Technologies या टेलिकॉम नेटवर्किंग कंपन्यांपैकी आहेत ज्यांना अलीकडे घुसखोरी आणि उल्लंघन आढळले आहे.

मॅक्रॉनन इस्त्रायलच्या पाठीशी उभा राहणार

वृत्तसंस्था

पॅरिस : फ्रान्सने इस्रायलला होणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या पुरवठ्यावर बंदी घालण्याची मागणी केल्याच्या मुद्द्याने आता जोर पकडला आहे. फ्रान्सच्या या पावलानंतर इस्रायलच्या पंतप्रधानांनी राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांना फटकारल्यानंतर मॅक्रॉनचा सूरही बदलला. इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी मॅक्रॉनला सांगितले. नेतन्याहू यांनी फ्रान्स आणि इतर पाश्चात्य नेत्यांना इस्रायलला शस्त्र पुरवठ्यावर बंदी घालण्याचे आवाहन केल्यानंतर एक निवेदन जारी केले.



योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते महाकुंभमेळा वेबसाइट आणि अँप लॉन्च

महाकुंभमेळाच्या लोगोचे अनावरण

देशोन्नती वृत्तसंकलन

प्रयागराजः उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज रविवारी (दि. ६) प्रयागराजमध्ये महाकुंभ-२०२५ च्या लोगोचे अनावरण आज करण्यात आले. या सोबतच महाकुंभ मेळ्यासाठी वेबसाइट आणि ॲपचे देखील लॉन्चिंग झाले. प्रयागराजमध्ये होणाऱ्या महाकुंभ-२०२५ साठीच्या लोगोमध्ये कुंभ राशीचे चिन्ह कलश आहे. ज्यामध्ये ओम लिहिलेले आहे. मागे संगमाचे दृश्य आहे. तसेच भगवान हनुमानजींचे चित्र व मंदिर आहे. अनावरणासोबतच मुख्यमंत्र्यांनी उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य आणि जलशक्ती मंत्री स्वतंत्र देव सिंह यांच्या उपस्थितीत अधिकाऱ्यांसोबत महाकुंभाच्या तयारीची आढावा बैठक झाली. अखिल भारतीय आखाडा परिषदेने कुंभ आणि महाकुंभ दरम्यान विविध आखाड्यांमधील शाहीस्नान आणि पेशवाई या उर्दू-फारसी शब्दांऐवजी हिंदी-संस्कृत शब्द वापरण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे. यासोबतच गायीला राष्ट्रमाता घोषित करणे, मंदिरांमधील सरकारी हस्तक्षेप दूर करणे, देशभर समान नागरी कायदा लागू करणे यासह अन्य ठरावही मंजूर करण्यात आले आहेत.

वेबसाइट मार्गदर्शक म्हणून करेल काम

२०२५ मध्ये होणाऱ्या महाकुंभ मेळयासाठी तयार करण्यात आलेल्या वेबसाइट आणि ॲपमध्ये अनेक वैशिष्ट्ये आहेत. महाकुंभ २०२५ चा लोगो महाकुंभ वेबसाइट आणि ॲपवर इतर प्रचार माध्यमांसह वापरला जाईल. भाविक आणि पर्यटकांना महाकुंभला विमान, रेल्वे आणि रस्ते मार्गाने पोहोचण्यासाठी वेबसाइट मार्गदर्शक म्हणून काम करेल. याद्वारे प्रयागराजमधील निवास व्यवस्था, स्थानिक वाहतूक, पार्किंग, घाटावर जाण्याचे दिशानिर्देश आदींची माहिती उपलब्ध होणार आहे. यात स्थानिक आणि जवळपासची आकर्षणे आणि पर्यटन स्थळांसाठी मार्गदर्शक देखील आहेत. जत्रेच्या परिसरात कसे जायचे आणि धार्मिक कार्यात सहभागी कसे व्हावे याबद्दल तपशीलवार माहिती दिली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

गाझातील मशिदीत 'हमासचा तळ'

देशोन्नती वृत्तसंकलन

इस्रायलच्या हवाई हल्ल्यात २४ ठार

गाझा : इस्रायलने आज गाझा मशिदीवर हवाई हल्ला केल्याचे सांगण्यात येत आहे. या हल्ल्यात २४ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ९३ जण जखमी झाले आहेत. पॅलेस्टिनी वृत्तसंस्था वाफाने ही माहिती दिली. मध्य गाझा पट्टीतील देर अल-बालाह येथील अल-अक्सा रुग्णालयाजवळील मशिदीवर हा हल्ला झाला. मशिदीत विस्थापित लोकही राहत असल्याने मृतांचा आकडा वाढू शकतो असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

इस्रायलच्या लष्कराने हवाई हल्ल्याबाबत जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, देयर अल-बालाह भागातील शुहादा अल-अक्सा मशिदीमध्ये उपस्थित हमासच्या दहशतवाद्यांवर अचूक हल्ला करण्यात आला. हे दहशतवादी कमांड चालवत होते. आणि येथून नियंत्रण केंद्र.'

गाझामधील धार्मिक व्यवहार मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, गाझामधील १,२४५ मशिदींपैकी ८१४ मशिदी नष्ट झाल्या आहेत आणि आणखी १४८ मशिदींसोबतच १९ चर्चही उद्ध्वस्त झाल्या आहेत. ६० स्मशानभूमींपैकी ज्यांना जाणीवपूर्वक लक्ष्य केले गेले होते ते मंत्रालयाच्या मालमत्तेचे अंदाजे आर्थिक खर्च ३५० दशलक्ष आहे गाझामधील धार्मिक व्यवहार मंत्रालयाने इस्रायलवर कबरींची विटंबना करणे, मृतदेह खोदणे आणि मृतांविरुद्ध हिंसाचार केल्याचा आरोप केला आहे.

मशिदीचे बांधकाम पाडण्याचा आदेश

शिमला : हिमाचल प्रदेशची राजधानी शिमला येथील वादग्रस्त संजौली मशिदीचे बेकायदेशीर बांधकाम पाडण्याचा आदेश शिमला महानगरपालिकेच्या आयुक्तांनी दिला आहे. त्यानुसार आता या मशिदीचे तीन बेकायदा मजले पाडण्यात येणार आहेत. या मशिदीच्या विरोधात काही दिवसांपूर्वी स्थानिक जनतेने आणि हिंदू संघटनांनी मोठे आंदोलन केले होते. ही मशीद सरकारी जागेवर अतिक्रमण करून बांधण्यात आली आहे, असा आंदोलकांचा आक्षेप होता. तसेच या मशिदीच्या आसपास घुसखोरांनी वस्ती केली असून त्यामुळे या भागात गुन्हेगारीचे प्रमाण वाढल्याचाही स्थानिकांचा आरोप आहे.

एकाच वेळी निवडणुका घटनाबाह्य नाहीत - रामनाथ कोविंद

देशोन्नती वृत्तसंकलन

नवी दिल्ली: एक राष्ट्र, एक निवडणूक या संकल्पनेवर स्थापन करण्यात आलेल्या समितीचे अध्यक्ष माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी सांगितले की, एकाच वेळी निवडणुका घेण्याची कल्पना संविधान निर्मात्यांची होती, त्यामुळे ती असंवैधानिक असू शकत नाही. ते म्हणाले की, अंमलबजावणी समिती एक देश एक निवडणूक लागू करण्यासाठी विविध घटनादुरुस्तींवर विचार करेल आणि त्यानंतर संसद अंतिम निर्णय घेईल. दिल्लीत लाल बहादूर शास्त्री यांच्या स्मरणार्थ आयोजित व्याख्यान देताना माजी राष्ट्रपती कोविंद म्हणाले की, १९६७ पर्यंत पहिल्या चार लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी झाल्या.

निवडणूक आयोगासह अनेक संस्थांनी यापूर्वी या संकल्पनेला पाठिंबा दिला आहे. एकाचवेळी निवडणुका घेतल्याने संघवाद आणखी मजबूत होईल, कारण तिन्ही स्तरांची सरकारे पाच वर्षे एकत्र काम करतील. 'एक राष्ट्र, एक निवडणूक' हा लोकप्रिय वाक्प्रचार आहे, ज्याचा काही लोकांनी चुकीचा अर्थ लावला आहे, असेही कोविंद म्हणाले. याअंतर्गत एकच निवडणूक होणार असून यापुढे निवडणुका होणार नाहीत, असा समज निर्माण झाला आहे.

पाकिस्तानात इम्रान खानंचा पक्ष पुन्हा रस्त्यावर !

रावळपिंडी, इस्लामाबादमध्ये मोबाईल सेवा बंद

वृत्तसंस्था

रावळपिंडी : पाकिस्तानमध्ये इम्रान खान यांच्या पाकिस्तान तेहरीक-ए-इन्साफ (पीटीआय) पक्षाने सलग दुसऱ्या दिवशी सरकारविरोधातील आंदोलन सुरु ठेवले आहे. यामुळे रविवारी (दि. ६) सलग दुसऱ्या दिवशी राजधानी इस्लामाबादमध्ये तणावपूर्ण वातावरण कायम आहे. दरम्यान, इम्रान खान यांच्या आदेशानंतर आंदोलन मागे घेतले जाईल, असेही पक्षाने स्पष्ट केले आहे.

पाकिस्तान तेहरीक-ए-इन्साफ पक्षाचे संस्थापक आणि माजी पंतप्रधान इम्रान खान यांना पाकिस्तान सरकारने विविध आरोपांखील ५ ऑगस्ट २०२३ रोजी अटक केली होती. काही प्रकरणांमध्ये न्यायालयाने त्यांना दोषी ठरवले आहे. सध्या ते रावळपिंडी येथील आदिलाला कारागृहात आहेत. या कारवाईविरोधात खैबर पख्तुनख्वाचे तेहरीक-ए-इन्साफ पक्षाचे मुख्यमंत्री अली अमीन गंडापूर यांनी गेल्या महिन्यात मोठ्या राजकीय आंदोलनाची घोषणा केली होती. एका वर्षाहून अधिक काळ ते कारागृहात आहेत. इम्रान खान यांच्या सुटकेच्या मागणीसह न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य आणि वाढत्या महागाईचा निषेध करणे हे आंदोलन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. शनिवारपासून सरकारविरोधातील आंदोलन सुरु झाले आहे.

इराणच्या अणुकेंद्रांवर हल्ल्याची योजना?, अमेरिकेचा विरोध पण इस्त्रायलची सज्जता

वृत्तसंस्था

जेरुसलेम : इराणच्या अणुकेंद्रांवर हल्ला करण्याची योजना इस्रायलने सज्ज केली आहे, अशी सूत्रांची माहिती आहे. मात्र् अद्याप यासंबंधी अधिकृत भाष्य करण्यात आलेले नाही. अमेरिकेने अशा कोणत्याही योजनेला आपला विरोध असल्याचे संकेत दिले आहेत. मात्र, इस्रायलने सर्व प्रकारची सज्जता केली असून अणुकेंद्रांना लक्ष्य बनविले जाणार नाही, असे आश्वासन अद्यापही अमेरिकेला दिलेले नाही, अशीही माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे मध्यपूर्वेतील संघर्ष वाढण्याची शक्यता आहे. मध्यपूर्वेतील संघर्षाची तीव्रता प्रमाणाबाहेर वाढू नये, यासाठी अमेरिकेने जोरदार प्रयत्न सुरु केले आहेत.

सहारनपूरमध्ये पोलीस चौकीवर दगडफेक !

देशोन्नती वृत्तसंकलन

सहारनपूर : उत्तर प्रदेशातील सहारनपूरमध्ये पोलिस चौकीवर दगडफेक झाल्यानंतर खळबळ माजल्याचे वृत्त आहे. यती नरसिंहानंद यांनी पैगंबराचा अनादर करण्याबाबत निवेदन दिल्यानंतर मुस्लिम तरुणांनी पोलिस चौकीत गोंधळ घातला आणि त्यानंतर दगडफेक सुरू केली. परिसरात मोठा

वादग्रस्त वक्तव्यावरून गदारोळ

पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी दंगलखोरांना रोखण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी दगडफेक सुरू केली. गोंधळ घालणाऱ्या तरुणांचा पोलिसांनी पाठलाग केला.

या प्रकरणी भाजपचे आमदार नंदकिशोर गुर्जर यांनी निवेदन दिले असून, डासना मंदिरावर हल्ला करणाऱ्यांचा एन्काउंटर व्हायला हवा. ते म्हणाले की, गोंधळ घालणाऱ्यांवर एनएसए अंतर्गत कारवाई झाली पाहिजे. हा हिंदूंच्या श्रद्धेवरचा हल्ला आहे, यामुळे लोक संतापले आहेत. मंदिरावरील हल्ल्यात दहशतवाद्यांचा हात आहे. सहारनपूरच्या ग्रामीण भागातील कोतवाली भागातील शेखपुरा कादीम गावातील

शेकडो लोक काही संघटनांसह गावात असलेल्या पोस्टवर निवेदन देण्यासाठी आले होते. गाझियाबादच्या यति नरसिंहानंद यांनी पैगंबराच्या सन्मानार्थ केलेल्या बेताल वक्तव्याविरोधात हे लोक निदर्शने करत होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोकांनी आधी पोलिस चौकीत निवेदन दिले मात्र त्यानंतर गावातील काही तरुणांनी पोलिस चौकीवर दगडफेक करून तेथे गोंधळ घातला.

वृद्धांना तरुण बनवण्याच्या नावाखाली फसवणूक

कानपूर : उत्तर प्रदेशातील कानपूरमधून एक अनोखा प्रकार समोर आला आहे. येथे एका जोडप्याने वृद्धांना तरुण बनवण्याच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली. या जोडप्याने दावा केला होता की त्यांच्याकडे इस्त्रायली तंत्रज्ञानाने बनवलेले मशीन आहे, जे ६० वर्षांच्या व्यक्तीला २५ वर्षांचे दिसू शकते.

डंपरने बसस्थानकावरील उभ्या लोकांना चिरडले

अपघातात ५ जणांचा दुर्दैवी मृत्यू !

देशोन्नती वृत्तसंकलन

दौसा : जिल्ह्यातील लालसोट बसस्थानकावर भरधाव वेगाने येणाऱ्या डंपरने बसस्थानकावर उभ्या असलेल्या लोकांना आणि अनेक दुचाकीस्वारांना चिरडले. या अपघातात ५ जणांचा जागीच मृत्यू झाला असून १० जण गंभीर जखमी झाले आहेत. डंपरचा ब्रेक निकामी झाला होता, त्यानंतर तो बसला धडकला आणि लोकांच्या गर्दीत घुसला, असे सांगण्यात येत आहे. दोन्ही गाड्यांखाली १५ जण दबले गेले. यामध्ये पाच जणांचा मृत्यू झाला असून १० जण जखमी झाले आहेत. सर्व गंभीर जखमींना लालसोट आणि दौसा येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अहमदाबादः अदाणी विद्यापीठाचा पहिला दीक्षांत समारंभ शांतीग्राम कॅम्पसमध्ये झाला. दीक्षांत समारंभात एमबीए (इन्फ्रास्ट्रक्चर मॅनेजमेंट), एमबीए (एनर्जी मॅनेजमेंट) आणि एमटेक (कन्स्ट्रक्शन इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट) प्रोग्रामच्या ६९ पदव्युत्तर विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

९ महिन्यांत ६७ जणांचा बुडून मृत्यू

देशोन्नती वृत्तसंकलन

पणजी : गेल्या काही दिवसांत राज्यात समुद्र, नदी किंवा अन्य पाणथळ ठिकाणी मृतदेह आढळण्याचे प्रमाण वाढले आहे. राज्यात जानेवारी ते सप्टेंबर या ९ महिन्यांत ६७ जणांचा बुडून मृत्यू झाला आहे. यामध्ये आत्महत्या केलेल्या व्यक्तींचाही समावेश आहे. दरम्यान, सर्वाधिक १० घटना पणजी आणि आजूबाजूच्या परिसरातील आहेत. अग्निशामक दलाकडून ही माहिती मिळाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वरील कालावधीत अग्निशामक दलाला बुडण्याच्या घटनांबाबत १०८ कॉल आले होते. यामध्ये ६७ जणांचा बुडून मृत्यू झाला तर ४ जणांना वाचवण्यात यश आले.

लोटली, मुळगाव, केपे येथे बुडून मृत्यू झाल्याच्या प्रत्येकी ४ घटना घडल्या होत्या. चिंचणी, म्हापसा, पेन्हा दी फ्रांका आणि ताळगाव येथून प्रत्येकी एक घटना घडल्या होत्या. तर हणजूण, असोळणा, कळंगुट, काणकोण, कुडतरी, कांदोळी, करमळी, दुर्भाट, शिरदोन, गांजे येथे बुडून मृत्यू पावण्याच्या प्रत्येकी २ घटनांची नोंद झाली आहे.

७७ टक्के मृत्यू बुडून

जानेवारी ते सप्टेंबर महिन्यात राज्यात विविध आपत्कालीन परिस्थितीत ८६ जणांना मृत्यू आला होता. यातील ६७ म्हणजेच ७७ टक्के मृत्यू हे बुडून झाले होते. वरील कालावधीत अग्निशामक दलाला ४०५ व्यक्ती तर ५४३ जनावरांना वाचवण्यात यश आले. अग्निशामक दलाकडून मिळालेल्या माहितीनुसार, मागील ९ महिन्यांत सप्टेंबरमध्ये सर्वाधिक १३ जणांचा बुडून मृत्यू झाला होता. यानंतर जुलैमध्ये ११, ऑगस्ट आणि मे मध्ये प्रत्येकी ९, एप्रिलमध्ये ८, फेब्रुवारीत ६, जून आणि मार्चमध्ये प्रत्येकी ४ तर जानेवारी महिन्यात ३ जणांचा बुडून मृत्यू झाला होता.

अग्निशामक दलाकडून माहिती

बुलेट ट्रेनसाठी पूल उभारण्याचे काम सुरू

वसई : मुंबई-अहमदाबाद या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणाऱ्या ५०८ किमी लांबीच्या बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. या बुलेट ट्रेनचा मार्ग पालघर जिल्ह्यातून जातो. त्यामुळे पालघर जिल्ह्यात वैतरणा खाडीवर त्यासाठी २. ३२ किलोमीटर लांबीचा पूल बांधण्यात येणार आहे. या पुलाच्या निर्मितीच्या कामासाठी खाडीवर एका तात्पुरत्या पुलाच्या उभारणीचे काम सुरू करण्यात आले आहे.

शिक्षकाने पेशाला काळिमा फासला!

आरोपीला फाशी द्या नागरिक उतरले रस्त्यावर!

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

एका खाजगी विद्यालयातील शिक्षकाने साडेपाच वर्षीय विद्यार्थिनीवर अत्याचार केल्याची घटना शहरात उघडकीस आली असून पोलिसांनी याप्रकरणातील आरोपीस बेड्या ठोकल्या आहेत. फास्ट ट्रॅक कोर्टामार्फत हे प्रकरण चालून शिक्षकाला तात्काळ फाशी द्यावी, अशी मागणी करत संतप्त माजलगावकर आज सकाळी रस्त्यावर उतरले. माजलगाव शहर कडकडीत बंद ठेवून जुन्या शहरातील हनुमान चौक ते तहसील कार्यालयापर्यंत निघालेल्या भव्य मोर्चात नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला होता.

शहराला लागून असलेल्या एका खाजगी विद्यालयात साडेपाच वर्षीय विद्यार्थिनीवर अत्याचाराची घटना उघडकीस आली आहे. पीडित मुलीने ओळखल्यानंतर याच शाळेतील शिक्षक राहुल

पान २ वर...

संस्था चालकावर गुन्हा नोंदवा

हा मोर्चा एवढा मोठा होता की, पहिली व्यक्ती तहसील कार्यालयात असताना शेवटची व्यक्ती हनुमान चौकात दिसून आली. एवढ्या मोठ्या प्रमाणात मोर्चा निघण्याची ही माजलगावच्या इतिहासातील पहिलीच वेळ दिसून आली. त्याचबरोबर माजलगाव शहर कडकडीत बंद असल्यामुळे कोठे पाणी देखील मिळणे मुश्किल झाले होते. यावेळी तहसीलदार संतोष रुईकर यांना निवेदन देण्यात आले. यावेळी मोर्चेकऱ्यांनी ज्या शाळेतील हा शिक्षक आहे त्या शाळेच्या संस्थाचालकांना सह आरोपी करून त्यांच्यावर देखील गुन्हे दाखल करावे अशी मागणी देखील करण्यात आली.

केज हद्दीत एलसीबीचे छापे!

इफेक्ट : गणेश खराडेसह अनेक अरोपीवर कारवाई

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज पोलीस ठाणे हद्दीत सुरु असलेले ऑनलाइन चक्री, तिर्रट, मटका आदी अवैध धंद्यांवर बीड एलसीबीने छापे मारले असून, यामध्ये जुगाराचे साहित्यासह १ लाख ५५हजार ७०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी १५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेला केज मधील अवैध धंदे दिसले पण स्थानिक पोलिसांना याची कानोकान खबर नसल्याने याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे. केज पोलीस ठाणे हद्दीत विविध ठिकाणी अनेक प्रकारचे अवैध धंदे सुरु असल्याची माहिती एलसीबीचे पोलीस निरीक्षकांना मिळाली होती. या सर्व ठिकाणी छापे मारण्यासाठी एलसीबी पथकाला आदेश देण्यात आले होते. त्यावरून पंचायत समीतीच्या बाजूस उमरी रोडवर फारुकी कॉम्प्लेक्स येथे ऑनलाईन चक्री जुगार अड्ड्यावर छापा मारला असता तेथे खेळताना सय्यद आसेफ युसुफ,

पान २ वर...

बीड शहराचे सांस्कृतिक वैभव टिकावे

जयदत्त क्षीरसागर : होम मिनिस्टर स्पर्धेचे बक्षीस वितरण

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालण्याचा प्रयत्न आणि सातत्याने केला आहे बीड जिल्हा संतांची भूमी जशी आहे तशी कलाकारांची भूमी आहे या भूमीत अनेकांमध्ये कलाकार दडलेले आहेत, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा हाच आमचा हेतू असतो असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले आहे

काकू नाना प्रतिष्ठान आणि जयदत्त अण्णा क्षीरसागर विचार मंचच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीच्या अंतिम फेरी ग्रँड फिनाले मेडिकल कॉलेजच्या मैदानात आयोजित करण्यात आला होता प्रारंभी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शुभारंभ करण्यात आला यावेळी अरुण डाके, डॉ विजुताई महिंद्रे-क्षीरसागर, सिनेअभिनेता आणि निवेदक क्रांती नाना माळेगावकर, बालकलाकार माळेगावकर, महिला आघाडी प्रमुख जयश्रीताई विधाते नगरसेवक मुखिद लाला, नाना मस्के, ॲड शेख खाजा, कीर्तीताई पांगारकर उषाताई सरवदे, भारती क्षीरसागर, अंजली पवार, जयश्री मेहत्रे, आणि तब्बल वीस दिवस प्रत्येक प्रभागात उत्कृष्ट सूत्रसंचालन करून कार्यक्रम यशस्वी करणारे निवेदक सुरेश साळुंके आदी उपस्थित होते

यावेळी माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की,राजकारण आणि समाजकारण या व्यतिरिक्त स्वर्गीय काकूंच्या काळापासूनच आम्ही जनतेची

पान २ वर...

निवडणूक तोंडावर उद्घटनांचा सपाटा

सवाल:आ.नमीता पाच वर्ष कुठं होतात

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

पाच वर्ष आमदारकी भोगणाऱ्या केज मतदार संघाच्या आमदार नमीताताई यांनी आता निवडणुकीच्या तोंडावर उद्घाटनाचा सपाटा लावला आहे. एकतर अगोदरच्या फुकटच्या कामाचे श्रेय घेण्यासाठी पुढे पुढे करणाऱ्या आमदारा नमीताताई यांनी पाच वर्षे झोपा काढल्या काय ? असा सवाल जनतेतून विचारला जाऊ लागला असून, आमदार नमीताताई या जनतेला कसे आणि काय उत्तर देणार? मतदार संघातील जनतेने संधी दिली होती मात्र आमदारा नमीताताई सारख्या आमदाराला या संधीचे सोने करता आले नाही बीड जिल्ह्यातील सहा मतदारसंघांपैकी केज मतदारसंघ हा सर्वात मोठा समजला जातो. आता विधानसभा निवडणुका लागणार असून या मतदारसंघाकडे सर्वाचे लक्ष लागले आहे.तालुक्यातील मतदारांनी आमदार मुंदडा यांना मतदान केले आणि आमदाराही केले. मात्र गेल्या साडेचार वर्षाच्या कारकिर्दीमध्ये आमदार नमीताताई हे लोकांच्या पसंतीला उतरले नाही. जनतेच्या ज्या अपेक्षा होत्या त्या पूर्ण करण्यात त्यांना अपयश आले. एक तर त्यांनी यापूर्वीच झालेल्या मतदारसंघातील कामाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला. मात्र लोकांना असे फुकटचे श्रेय घेणे आवडले नाही. सुरुवातीच्या काळामध्ये नमीताताई सत्तेमध्ये होत्या, त्यानंतर सरकार पडले मात्र काही दिवसानंतर ते पुन्हा सत्तेत आले, म्हणजे आमदारा नमीता मुंदडा हे या पाच वर्षांमध्ये किमान चार वर्षे सत्तेमध्ये राहिले आहेत. या चार वर्षाच्या सत्तेच्या काळामध्ये त्यांनी मतदारसंघांमध्ये काय आणि कोणती

पान २ वर...

डॉ.योगेश क्षीरसागरांच्या नेतृत्वावर विश्वास

पक्षांतर: राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात इनकमिंग

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पक्ष प्रवेश केल्यापासून पायाला भिंगरी बांधून मतदारसंघ पिंजून काढला आहे. त्यांचा जनसंपर्क, प्रभावी कार्यपद्धती पाहून विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते त्यांना साथ देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहेत.

बीड तालुक्यातील अंजनवती येथे दौऱ्यावर असताना डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत सदस्य सूर्यभान कार्डिले यांनी पक्षात प्रवेश केला. यावेळी माजी पंचायत समिती सभापती काकासाहेब जोगदंड, सरपंच बालासाहेब जाधव, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दिकी, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, पांडुरंग येडे, अभिमान येडे, सुभाष येडे, अशोक येडे, समीर शेख, फुलचंद येडे, श्रीराम घरत, सुनील घरत, माजेद कुरेशी, मिलिंद ठोकळ, दीपक जगदाळे, शिवाजी घरत, आसाराम घरत, राजेभाऊ क्षीरसागर उपस्थित होते. भाळवणी येथील विनोद

पान २ वर...

सेवानिवृत्त झाल्याबद्दल सत्कार सोहळा!

दादा दाभाडे:गृह रक्षक जवान कैलास मोरे सेवानिवृत्त

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारे व्यक्तिमत्व म्हणजे होमगार्ड. परमनंट नसले तरीही गुन्हेगारांचा रोष स्वतःवर ओढावुन घेण्याची धमक ठेवणारे ही होमगार्ड. असेच गेवराई पोलीस स्टेशन मधील व सर्व पोलीस कर्मचारी अधिकारी व नागरीकांच्या परिचयातील होमगार्ड कैलास बबनराव मोरे हे होमगार्ड खात्यातून सेवानिवृत्त झाले. होमगार्ड पदी कार्य करताना त्यांची ओळख सर्व दूर मोरे मामा म्हणून उमटली. परीक्षा बंदोबस्त, गणपती, नवरात्र, पेट्रोलिंग, होळी जिथे ड्युटी मिळाली तिथे कार्यावर हजर असणारे मोरे मामा. सर्व सहकाऱ्यांसोबत काम करत करत सेवानिवृत्त झाल्यावर मोरे मामांना आनंद अश्रू अनावर झाले होते. होमगार्ड खात्याचे तालुका समादेशक सतीश दादा दाभाडे यांनी कैलास मोरे यांचा सेवानिवृत्त झाल्याबद्दल सत्कार समारंभ आयोजित केला होता. त्या समारंभात होमगार्ड , मित्रपरिवार व हितचिंतक सहभागी झाले होते. सत्कार समारंभ प्रसंगी बोलताना सतीश दादा म्हणाले की आपले काम नेहमीच प्रामाणिकपणे करून, दिलेली जबाबदारी समाज हिताची असावी असा कायमच मनाशी मानस बाळगून ड्युटी करून कोणावरही अन्याय न करता कायद्याच्या चौकटीत राहून सर्वसामान्यांचे कायमच संरक्षणासाठी आपल्या खाकीचा उपयोग करणारे कर्तव्यदक्ष होमगार्ड म्हणून ज्यांनी आपली

पान २ वर...

> घरची परिस्थिती खूप हालाखीची होती. त्यात नशिबाने होमगार्ड म्हणून काम करण्याची संधी मिळाली. पाच भावंडांची जिम्मेदारी, आई - वडील अशिक्षित या सर्व गोष्टींची जाण ठेवून २२ रुपये रोजाप्रमाणे ड्युटीला सुरुवात केली. आजच्या काळात २२ रुपये लहान लेकराच्या चॉकलेटलाही पुरेसे नाहीत परंतु तेव्हा मी या रुपयांमध्ये माझं घर चालवायचो. मी होमगार्ड झालो व कार्यकाळ संपेपर्यंत नोकरी केली याचा मला अभिमान वाटतो.
>
> -कैलास बबनराव मोरे, सेवानिवृत्त होमगार्ड

कृषी सेवारत्न पुरस्काराने सन्मानित

अभिनंदनिय : विनायक देशमुख यांच्या कार्याची दखल

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील रहिवाशी आणि गडहिंग्लज (जिल्हा कोल्हापूर) सेवानिवृत्त उपविभागीय कृषी अधिकारी विनायक देशमुख यांना महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातील सर्वोच्च पुरस्कार, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. कडा येथील माजी मुख्याध्यापक स्व विष्णुपंत देशमुख यांचे पुत्र विनायक देशमुख यांचे प्राथमिक शिक्षण येथील जिप शाळेत तर माध्यमिक शिक्षण मोतीलाल कोठारी विद्यालयात झाले. ११ वी आणि १२ वीचे शिक्षण अ.नगर कॉलेजमध्ये पूर्ण करून त्यांनी कृषी पदवीचे शिक्षण कृषी महाविद्यालय, धुळे येथून पूर्ण केले .पदव्युत्तर शिक्षण महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे घेऊन ते महाराष्ट्र राज्य कृषी विभागात फलोत्पादन अधिकारी म्हणून रुजू झाले. शासनाच्या सेवेत असताना त्यांनी झऋऊ-एच् मॅनेज, हैद्राबाद आणि -सीळर्लीश्रीीीश खोीी रपव एीी, विदेश मंत्रालय, नवी दिल्ली हे पदविका अभ्यासक्रम पूर्ण केले. या अभ्यासक्रमासाठी शासनामार्फत त्यांची विशेष निवड करण्यात आली होती. राजगुरुनगर (जिल्हा पुणे) येथील कार्यकाळात उत्कृष्ट व्यवस्थापन करून त्यांनी पुणे विभागात प्रथम क्रमांक मिळविला. त्यावेळी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब भारदे, तत्कालीन संचालक फलोत्पादन डॉ. प्रकाश महिंद्रे यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले होते. रोपवाटीकेवरील व्यवस्थापन पाहून तत्कालीन राज्यपाल डॉ. पी. सी. अलेक्झांडर यांनी देखील या रोपवाटिकेस भेट देऊन त्यांच्या कार्याची प्रशंसा केली होती.

सन १९९३ ते २००८ या कालावधीत कृषी आयुक्तालयातील फलोत्पादन विभागात त्यांनी हरितगृहातील पुष्पोत्पादन, औषधी व सुगंधी वनस्पती, भाजीपाला उत्पादन या संदर्भात विविध योजनांचा राज्यस्तरावरील समन्वय करून

पान २ वर...

र व पुरस्कार वितरण समारंभ २०२४
शुभहस्ते
मा.श्री.सी.पी. राधा
अध्यक्ष
मा.श्री. एकन

निर्णय बाबरी मुंडेंच्या संपर्क कार्यालयाचे उदघाटन

मी माझी उमेदवारी भाजपा कडून लावून धरनारच! ...अन्यथा अपक्ष मैदानात उतरण्याची तयारी

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव मतदार संघाच्या निवडणूकित रोज एक एक रंग बघायला मिळत आहेत युतीच्या फॉर्म्युल्यात ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला आली आहे मात्र येथील कट्टर भाजपच्या मतदारा कडून मात्र यावर नाराजीचा सूर आहेत त्या मुळे आज पर्यंत भाजपच्या तिकिटावर ही निवडणूक लढवणारचे स्वप्न भंग होऊ पाहत आहेत त्यात भाजपाचे कट्टर समर्थक व पंकजाताई मुंडे यांचे खंदे समर्थक यांनी कुठलीही वाट न पहाता आपले काम सुरू केले आहे त्या दृष्टीने काल अनेक भाजपचे समर्थक घेऊन माजलगाव शहरात बायपास रोड वर बाबरी मुंडे यांनी आपले विधानसभा संपर्क कार्यालयाचे थाटात उद्घाटन केले विशेष म्हणजे भाजपचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य डॉ प्रकाश आनंदगावर यांच्या शुभ हस्ते हे सर्व करण्यात आले

या वेळी उपस्थित पत्रकारांसी संवाद साधताना बाबरी मुंडे म्हणाले की आम्ही २००९ पासून भाजपाचे काम करत आहोत. बीड जिल्हा हा भाजपाचा गड आहे. येथील मतदार मोठ्या प्रमाणात भाजपाला मानणारा आहे. परंतु राज्यात, जिल्ह्यात राजकीय परिस्थिती बदलली आहे. महायुतीचा प्रयोग झाल्याने अनेक मतदारसंघात उलथापालथ झाली आहे. माजलगाव मतदार संघाची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला जाण्याची शक्यता आहे. परंतु ही बाब भाजप मतदाराला आवडल्यासारखी दिसत नाही. त्यामुळे भाजपाचे मतदान राष्ट्रवादीला पडण्याची सुतराम शक्यता नाही. परंतु असे असले तरी अनेक जण गुडघ्याला बाशिंग बांधून माजलगाव विधानसभेसाठी पुढे सरसावले आहेत. यात भाजपाला विरोध करणारेही आहेत. परंतु भाजपाचा मतदार त्यांना मतदान करणार नाही. यामुळे भाजपाकडे रीतसर तिकिटाची मागणी करत मी विधानसभेच्या मैदानात उतरणार आहे. पक्षाने तिकीट नाही दिले तर अपक्ष निवडणूक लढवणार आहे. असेही ते यावेळी म्हणाले. दरम्यान बाबरी मुंडेच्या अपक्ष लढण्याच्या तयारी मुळे येथील राजकीय समीकरणे बदलणार असल्याची चर्चा आहे. बाबरी मुंडे यांनी अपक्ष निवडणूक लढवण्याचा निर्धार करत शहरात सुरू केलेल्या

पान २ वर...

जो उमेदवार देतील तो उमेदवार मान्य

पत्रकार परिषद: उबाटा गटाने स्पष्ट केली भूमिका

लोणार/पुण्यभूमी प्रतिनिधी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने लोणार तालुक्यातील पदाधिकारीच्या वतीने अथर्व हॉटेल मंठा रोड लोणार या ठिकाणी पत्रकार परिषद घेण्यात आली. या पत्रकार परिषेदे मध्ये श्री विजय मोरे (संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती लोणार). मा. उध्दव साहेब ठाकरे जो उमेदवार देतील किंवा महा विकास आघाडीचा जो उमीदवार राहील तो उमेदवार मान्य असेल असे मत त्यांनी मांडले. राजु बुधवत (विभाग प्रमुख) मा. उध्दव साहेब व महा विकास आघाडी जो उमेदवार देतील त्या उमेदवाराचा काम प्रमाणिक पणे करु असे मत त्यांनी व्यक्त केले. सुदन अंभोरे (शिव सेनिक) यांनी आपले मत व्यक्त करतांना सांगीतले की, मेहकर विधानसभा मतदारसंघ सन २००९ साली अनुसूचीत जाती साठी राखीव झाला होता त्यावेळेस उमेदवाराची स्पर्धा जास्त नव्हती परंतु या वेळेस शिवसेना पक्षातील आमदारांनी गद्दारी केल्यामुळे पक्षाकडे ईच्छुक उमेदवाराची संख्या वाढत आहे. काही मतदार संघातील उमेदवार असले तरी फक्त त्यांची जन्म भूमी मतदार संघ आहे. मात्र त्यांची कर्मभूमी सुध्दा बाहेरील आहे. काही लोकांनी शिवसेना पक्षात प्रवेश करण्या अगोदर वेगळया पक्षाचे पदाधिकारी होते. सन २००९ च्या अगोदर बुलढाणा लोकसभा मतदार संघात मान्य बाळकृष्ण वासनीक, मुकुल वासनीक,आनंद आडसुळ यांनी सुध्दा अनेक वर्ष बुलढाणा लोकसभा मतदार संघाचे खासदार होते. उध्दव ठाकरे जो उमेदवार देतील त्या उमेदवारास निवडुण आणण्यासाठी आम्ही सर्व पदाधिकारी जिवाचे रान करु उपप्रमुख परमेश्वर दहातोंडे ता. संघटक कैलास अंभोरे, अल्पसंख्यांक ता. प्रमुख सैय्यद उमर, शहर संघटक तान्हाजी मापारी, युवासेना शहर प्रमुख लालु भाई, विष्णु अवचार गट प्रमुख, युवासेना सहसचिव राजु मुळे, गट प्रमुख डॉ. राजेश मोरे, कृषी उत्पन्न बाजार समिती माजी सदस्य पुंजाराम जाधव, शाखा प्रमुख चिंचोली प्रतापराव सांगळे, शिवसेना नेते गोपाल मापारी, शाखा प्रमुख युवराज दराडे, शाख प्रमुख राजु दहातोंडे, शिवसेनिक बद्री कायंदे, शिवसेनिक सुरेश पौळकर, इत्यादी पदाधिकारी पत्रकार परिषेदेत उपस्थित होते. या पत्रकार परिषेदेचे नियोजन श्री. तेजराव घायाळ (संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती लोणार) यांनी केले.

पान २ वर...